रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ५८
www.ramprahar.com
बुधवार, १३ सप्टेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## गणेशमूर्तींवर शिक्का उमटवण्याचा निर्णय रद्द



**मुंबई :** यंदाचा गणेशोत्सव अधिकाधिक पर्यावरणपूरक व्हावा यासाठी गणेशमूर्तींवर सांकेतिक रंगाचा शिक्का उमटविण्याचे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनामार्फत सुरुवातीला देण्यात आले होते. पर्यावरणपूरक आणि इतर मूर्तींमधला फरक कळावा यासाठी असे करण्यात येणार होते, परंतु भाविकांच्या भावना लक्षात घेऊन गणेशमूर्तींवर शिक्का न उमटविण्याचे निर्देश मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिले आहेत तसेच या निर्णयाची माहिती मूर्तीकारांपर्यत प्रभावीपणे पोहचविण्याचेही पालकमंत्र्यांनी प्रशासनाला सूचित केले आहे. त्यानुसार विभाग स्तरावर मूर्तीकारांशी संपर्क साधण्याची कार्यवाही तत्काळ सुरू करण्यात आली आहे.

अंतरंग
एनडीएतील पक्षांची समन्वय समिती होणार स्थापन/२
मुंबई-गोवा महामार्गावर सुविधा केंद्राचे उद्घाटन/५
रायगड प्रीमियर लीगसाठी ४४८ खेळाडूंवर बोली/८

### मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडून आश्वासनपूर्ती

# कशेडी बोगद्याचे लोकार्पण

**पोलादपूर, महाड : प्रतिनिधी**

दक्षिण कोकणाचे प्रवेशद्वार समजल्या जाणाऱ्या व कोकणवासीयांच्या जिव्हाळ्याच्या असणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गावरील पोलादपूर येथील कशेडी घाट बोगद्याचे मंगळवारी (दि. १२) राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यामुळे येथून सुलभ व वेगवान वाहतूक होणार आहे.

### प्रवासात वेळ आणि इंधनाची होणार बचत



सार्वजनिक बांधकाममंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर रवींद्र चव्हाण यांनी तब्बल १३ वेळा मुंबई-गोवा महामार्गाची नुसती पाहणीच केली नाही, तर दिलेल्या शब्दाप्रमाणे कासू ते इंदापूरदरम्यान ४० किलोमीटरच्या काँक्रीटच्या एकेरी मार्गाचे काम पूर्णत्वास आणले. याशिवाय गणेशभक्तांना गणेशोत्सवापूर्वीच गावी जाण्यासाठी कशेडी बोगदा खुला करणार, असे आश्वासन त्यांनी दिले होते. आश्वासनाला जागत त्यांनी मंगळवारी या २.१ किमी लांबीच्या एकेरी बोगद्याचे लोकार्पण केले. या बोगद्यामुळे अवघड आणि धोकादायक असलेला कशेडी घाटातील प्रवास आता संपुष्टात आला आहे.

या बोगद्यामुळे प्रवासातील ४५ मिनिटे आणि इंधन वाचणार आहे. त्यामुळे आता कशेडी बोगदा सुरू झाल्याच्या आनंदाने या बोगद्यातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी या वेळी मंत्री रवींद्र चव्हाण यांचे आभार मानले, तर ना. चव्हाण यांनी या प्रवाशांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी बोगद्याच्या प्रवेशव्दारावर मंत्रीमहोदयांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमास भाजपचे रत्नागिरी जिल्हाध्यक्ष केदार साठे, रायगड जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, महाड तालुका सरचिटणीस महेश शिंदे, शहर अध्यक्ष निलेश तळवटकर, युवा मोर्चा अध्यक्ष प्रसाद हटकर, सागर हिरवे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या वेळी मंत्री चव्हाण यांनी या बोगद्यासाठी अथक कष्ट करणारे कामगार व अधिकाऱ्यांचे कौतुक केले.

## मनोज जरांगे-पाटील यांच्याकडून अखेर सरकारला एक महिन्याचा अवधी

■ मराठा आरक्षणासाठी पुकारलेले उपोषण तूर्त मागे

**जालना : प्रतिनिधी**

मराठा समाजाला टिकणारे आरक्षण हवे असेल, तर एक महिन्याचा अवधी द्यावा, असे राज्य सरकारने म्हटले होते. आरक्षणासाठी जालन्यातील अंतरवाली सराटी येथे उपोषणास बसलेले मनोज जरांगे-पाटील यांनी ते मान्य केले आहे, परंतु त्यांनी काही अटी ठेवल्या आहेत.



मनोज जरांगे-पाटील म्हणाले, अनेक तज्ज्ञांनी, निवृत्त न्यायाधीशांनी सल्ला दिला आहे की, आपण मोठ्या ताकदीने आंदोलन उभे केले आहे, त्याचे सोने करायला हवे. तज्ज्ञ सांगतायत उपोषण एक महिन्यासाठी मागे घ्या, सरकारला ३० दिवसांची मुदत द्या. ३१व्या दिवशी आरक्षण मिळाले नाही, तर मग उपोषणाला बसा, पण या ३० दिवसांत आंदोलन सुरूच ठेवा. त्यानुसार आपण सरकारला ३० दिवसांची मुदत देत आहोत, पण उपोषण मागे घेतले तरी आरक्षण मिळत नाही तोवर आंदोलन सुरूच राहील.

जरांगे-पाटील यांनी पुढे सांगितले की, सरकारला एक महिन्याचा वेळ दिला तरी मी ही जागा सोडणार नाही. तुमच्या हातात जातप्रमाणपत्र मिळत नाही तोवर मी मागे हटणार नाही. आपण सरकारला ४० वर्षे दिली आहेत, आता एक महिना देऊ. या वेळी त्यांनी सर्व आंदोलकांना विचारले की, आपण या सरकारला एक महिना द्यायचा का? त्यावर सर्व आंदोलकांनी होकार दिला.

मी तुमचा सर्वांचा आहे, माझ्यावर शंका घेऊ नका. समाजावर डाग लागू नये व कोणी बदनाम करू नये. सरकारला एक महिना दिला नाही म्हणून कुणी काही बोलू नये म्हणून मी केवळ जातीसाठी दोन पावले मागे जातोय. आरक्षणाचे जात प्रमाणपत्र हातात मिळेल त्या दिवशी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच खासदार उदयनराजे भोसले आणि संभाजीराजे छत्रपती आल्यावर आमरण उपोषण सोडेन, असेही ते म्हणाले.

## निवडक


### लीबियामध्ये वादळ, महापूर; दोन हजार लोक मृत्युमुखी

**त्रिपोली :** मोरोक्कोमध्ये भूकंपाची घटना ताजी असतानाच भूमध्य समुद्रात आलेल्या डॅनियल वादळामुळे लीबियातील किनारी भागात असणाऱ्या शहरांत महापूर आला आहे. यामध्ये दोन हजारहून अधिक लोकांचा बळी गेल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे, तर तब्बल १० हजारांहून अधिक लोक बेपत्ता झाले असल्याचे सांगण्यात येत आहे.

### सौदी अरेबिया भारतात करणार मोठी गुंतवणूक

**नवी दिल्ली :** भारताच्या दौऱ्यावर आलेले सौदी अरेबियाचे राजकुमार मोहम्मद बिन सलमान बिन अब्दुल अजीझ अल-सौद आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात मंगळवारी (दि. १२) व्यूहात्मक भागीदारी परिषदेमध्ये चर्चा झाली. विशेष म्हणजे आगामी वर्षात सौदी अरेबिया भारतात ८.२० लाख कोटींची गुंतवणूक करणार असल्याचे या वेळी सांगण्यात आले.

## लोकनेते दि. बा. पाटील विमानतळ कृती समितीतर्फे गणेश आरास स्पर्धा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीतर्फे भव्य गणेशोत्सव आरास स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यस्तरीय व तालुकास्तरीय असलेली ही स्पर्धा सार्वजनिक व घरगुती अशी दोन विभागांत होणार आहे.

प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दि. बा. पाटील यांचे समाजासाठी योगदान, त्यांच्या नावासाठी विमानतळ नामकरणाचा लढा, चांद्रयान-३ आणि देशाचा वाढलेला गौरव या तीन विषयांवरील देखाव्यांना या स्पर्धेत पुरस्कृत करण्यात येईल. राज्यस्तरीय पहिल्या पाच विजेत्या सार्वजनिक मंडळांना अनुक्रमे २५ हजार रुपये, १५ हजार, ११ हजार आणि उत्तेजनार्थ सात हजार; तर राज्यस्तरीय घरगुती गणपती आराससाठी ११ हजार रुपये, सात हजार, पाच हजार आणि अडीच हजार रुपये अशी पारितोषिके, सन्मानचिन्हे व प्रशस्तीपत्रक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येईल.

तालुकास्तरीय सार्वजनिक गणेशोत्सव आरास स्पर्धेसाठी ११ हजार, सात हजार, पाच हजार आणि उत्तेजनार्थ दोन हजार रुपये तसेच घरगुतीसाठी सात हजार, पाच हजार, अडीच हजार रुपये व उत्तेजनार्थ १५०० रुपये अशी पारितोषिके, सन्मानचिन्हे व प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे.

प्रथम क्रमांकाच्या तालुकास्तरीय घरगुती आणि सार्वजनिक विजेत्या मंडळास राज्यस्तरीय स्पर्धेत सरळ प्रवेश मिळणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्याकरिता क्युआर कोडद्वारे तसेच https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSfq01U0fmkyPU4cL6RcqmhtPPHlqxc87mF6MfkYG6MiI7wFbQ/viewform या गुगल फॉर्म लिंकद्वारे नोंदणी करण्याचे आवाहन कृती समितीतर्फे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी मंत्री जगन्नाथ पाटील यांनी केले आहे.

## मुंब्रा रेतीबंदर किनारी स्फोटकांचा साठा जप्त

**ठाणे : प्रतिनिधी**

गणेशोत्सवापूर्वी ठाणे पोलिसांनी मुंब्रा येथे मोठी कारवाई केली आहे. मुंब्रा रेतीबंदर किनारी ठाणे पोलिसांनी मंगळवारी (दि. १२) स्फोटकांचा साठा जप्त केला. खाडीपात्रात सक्शन पंप वापरून अवैध रेती उत्खनन करण्यासाठी हे साहित्य वापरले जाणार होते.

मुंब्रा रेतीबंदर दोन बार्जमध्ये येथे १६ जिलेटिन कांड्या आणि १७ डिटोनेटर आढळले. या खाडीपात्रात सक्शन पंप वापरून अवैध रेती उत्खनन करण्यासाठी हे साहित्य वापरले जाणार होते. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी जाऊन हा साठा हस्तगत केला तसेच काही जणांना पकडले आहे. खाडीत दोन बार्ज आढळून आले असून ते कोणाच्या मालकीचे आहेत याचा शोध पोलीस घेत आहेत.

## खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते पतसंस्थेच्या शाखेचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जय गगनगिरी सहकारी पतसंस्थेची दुसरी शाखा कामोठे शहरात सुरू झाली असून या शाखेचे उद्घाटन खासदार श्रीरंग बारणे आणि भाजपचे मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. ११) करण्यात आले.



शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्या अध्यक्षतेखाली जय गगनगिरी सहकारी पतसंस्था कार्यरत आहे. या पतसंस्थेची दुसरी शाखा कामोठे सेक्टर २० येथे नव्याने सुरू झाली आहे. या शाखेचे उद्घाटन मावळचे खासदार श्रीरंग बारणे आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

उद्घाटन समारंभास भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे सचिव किरण पावसकर, संजय मोरे, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, ॲड. प्रथमेश सोमण, युवा नेते हॅप्पी सिंग, पतसंस्थेचे उपाध्यक्ष विलास कदम, सचिव नारायण अमृते, खजिनदार चंद्रकांत बागल आदी उपस्थित होते.






# दीड वर्षात तीन लाख तरुणांना रोजगार

**मुंबई : प्रतिनिधी**

कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून गेल्या दीड वर्षामध्ये तीन लाख उमेदवारांना रोजगार प्राप्त झाला आहे. भारत युवा देश म्हणून ओळखला जातो. युवकांना कौशल्य विकासाच्या, रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागांतर्गत ४१८ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासिकांच्या वर्गांचे ऑनलाईन उद्घाटन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. कार्यक्रमास कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रकाश सुर्वे, अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, कौशल्य



## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती

विकास आयुक्त डॉ. रामास्वामी एन., व्यवसाय व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक दिगंबर दळवी, सहसंचालक अनिल गावीत यांच्यासह ४१८ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे प्राचार्य व विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आज ४० हजार विद्यार्थी ऑनलाईन उपस्थित आहेत, त्या सर्वांचे मी खूप खूप अभिनंदन करतो. नव्याने सुरू झालेल्या ७५ आभासी क्लासरूम आणि आज सुरू झालेल्या अभ्यासिका यांचा विद्यार्थी लाभ घेऊन स्वविकास करतील, अशी मला आशा आहे.

मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या नेतृत्वामध्ये गेल्या दीड वर्षामध्ये तीन लाख तरुणांना रोजगार प्राप्त झाला असून कौशल्य विकास प्राप्त युवकांना भविष्यातही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. उद्योजकतेला लागणारे नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान लक्षात घेऊन आयटीआयमध्ये विविध ९०० कोर्सेस शिकवले जातात, ही अभिमानाची गोष्ट असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, महाराष्ट्र राज्य हे नेहमी देशाचे ग्रोथ इंजिन म्हणून काम करीत आहे. परदेशी गुंतवणूक आणि पायाभूत सुविधांमध्येदेखील राज्य प्रथम क्रमांकावर आहे. यामुळेच आज अनेक उद्योजक राज्यात गुंतवणूक करण्यासाठी इच्छुक असतात. हीच बाब लक्षात घेऊन उद्योग जगताला आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून आपण नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान युवा पिढीला देण्यासाठी प्रयत्नशील आहोत.

या वेळी मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या एक वर्षाच्या कालावधीमध्ये कौशल्य विकास विभाग, महिला बाल विकास विभाग, पर्यटन विभाग आणि मुंबई उपनगरचे पालकमंत्री म्हणून केलेल्या कामगिरीचा आढावा 'स्वयंसेवक ते जनसेवक' या पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

### 'विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पोषक वातावरण'

*मंत्री मंगलप्रभाग लोढा म्हणाले की, राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पूरक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या रोजच्या प्रशिक्षण वेळेनंतर संध्याकाळी साडेआठ वाजेपर्यंत अभ्यासिका सुरू करण्यात आल्या आहेत. मुले व मुलींकरिता स्वतंत्र वर्ग खोल्या उपलब्ध करून देण्यात येतील.*

# वंचित समाजाचे प्रश्न भाजप सोडविणार

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची ग्वाही



**मुंबई : प्रतिनिधी**

वंचित समाजाचे विकासाचे प्रश्न सरकारच्या माध्यमातून भाजप सोडवेल, अशी ग्वाही प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी (दि. १२) दिली. वंचित बहुजन आघाडीचे नेते संजय भोसले यांच्या भाजप प्रवेश कार्यक्रमात बावनकुळे बोलत होते.

या कार्यक्रमाला माजी आमदार सुधाकर भालेराव, भाजप प्रदेश सचिव नवनाथ पडळकर, प्रवक्ते असिफ भामला, पंडित राठोड आदी उपस्थित होते. श्री. भोसले यांच्याबरोबर राज्यातील घडशी समाज तसेच राष्ट्रीय समाज पक्षाच्या कार्यकर्त्यांनी या वेळी भाजपमध्ये प्रवेश केला.

प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी श्री. भोसले यांचे स्वागत करीत भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे महासचिव म्हणून त्यांची नियुक्ती केल्याची घोषणा केली. श्री. भोसले यांनी वंचित बहुजन आघाडीचे अनेक वर्षे काम केले असून त्यांनी दक्षिण मध्य मुंबईमधून २०१९ची लोकसभा निवडणूक लढवली होती.

प्रदेशाध्यक्ष बावनकुळे म्हणाले की, पंतप्रधान मोदी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकर्तृत्वावर विश्वास ठेवून अनेक पक्षांतील कार्यकर्त्यांचा ओढा भाजपकडे वाढला आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून वंचित समाजाचे प्रश्न मार्गी लावले जातील तसेच घडशी समाजाच्या मागण्यांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठक आयोजित करण्यात येईल, असेही बावनकुळे यांनी नमूद केले.

वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण भाजपमध्ये प्रवेश केल्याचे श्री. भोसले यांनी या वेळी सांगितले. भोसले यांच्याबरोबर भाजपमध्ये गोरख उबाळे, पंकज चाबुकस्वार, सुजाता कांबळे, संगीता शिंदे, राष्ट्रीय समाज पक्षाचे किसनराव हंडाळ, राज्य घडशी समाजाचे कार्याध्यक्ष शिवाजी कदम, पुणे जिल्हाध्यक्ष घनश्याम मोरे, अशोक काळे, सुनील वाडेकर, दयानंद खरात, किरण यादव, ऋषिकेश घाडगे आदींनी भाजपमध्ये प्रवेश केला.

# आमच्या नेत्यांचा अवमान केला, तर त्याच भाषेत उत्तर देऊ!

## भाजप महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर हीन भाषेत टीका केल्यास उद्धव ठाकरे व त्यांच्या चेल्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल, असा इशारा भाजप महिला मोर्चा प्रदेश अध्यक्ष चित्रा वाघ यांनी मंगळवारी (दि. १२) दिला. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

भाजप प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष वर्षा भोसले, महिला मोर्चा प्रदेश कार्यकारिणी





सदस्य मृणाल पेंडसे, भाजपा प्रदेश प्रवक्ते ओमप्रकाश चौहान या वेळी उपस्थित होते. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर वर्णद्वेषी भाषेत टीका करून भास्कर जाधव यांनी समस्त ओबीसी समाजाचा अपमान केला आहे. याबद्दल जाधव यांनी ओबीसी समाजाची माफी मागावी, अशी मागणीही वाघ यांनी केली.

चित्रा वाघ म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली जी-२० परिषदेची यशस्वी सांगता झाली. जगभरात भारताची मान उंचावली. मोदी यांच्या नेतृत्वाची प्रशंसा झाली. असे असताना उद्धव ठाकरे आणि त्यांच्या चेल्यांनी भाजपाच्या नेत्यांचा खालच्या स्तरावर जाऊन अवमान करण्याची स्पर्धाच लावली आहे. या नेत्यांच्या बालीशपणाची कीव येते. स्वत:च्या नाकर्तेपणामुळे आज उद्धव ठाकरे यांची अवस्था करमणूक करणाऱ्या विदुषकासारखी झाली आहे, असे वाघ म्हणाल्या. विदुषक निदान निखळ मनोरंजन तरी करतात पण हे कामदेखील श्री. ठाकरे आणि त्यांच्या टोळीला जमत नाही अशी कोपरखळी त्यांनी मारली. महिला मोर्चातर्फे श्री. ठाकरे यांना विदुषकाचा पोषाख पाठवत असून हा पोषाख पाहून श्री. ठाकरे यांना आपण केवळ करमणुकीपुरते उरलो आहेत याची जाणीव होईल असेही त्या म्हणाल्या.

ठाकरे यांच्या टोळीतील सर्वज्ञानी संजय राऊत, शिवीगाळ करणारे भास्कर जाधव यांनी वेळीच तोंडाला आवर घालावा अन्यथा परिणामांस सामोरे जावे लागेल. आमचे नेते, कार्यकर्ते संस्कारी, संयमी आहेत मात्र यापुढे संयमाचा बांध फुटेल आणि त्याच भाषेत उत्तर मिळेल, असेही वाघ यांनी सांगितले.

## तरुणाची आत्महत्या

**पोलादपूर** : शहरातील मंगलमूर्ती अपार्टमेंटमध्ये एका तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. यश अनंत चिकणे असे या १८ वर्षीय तरूणाचे नाव असून त्याच्या आत्महत्येचे कारण अद्याप समजले नाही.



मंगलमुर्ती अपार्टमेंटमधील सदनिकेमध्ये यशने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे सोमवारी सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास आढळले. सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज म्हसकर आणि कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. शवविच्छेदनानंतर यशचा मृतदेह नातेवाईकांना सोपविण्यात आला.

## पनवेलजवळ कारला अपघात; दोघे ठार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील जेएनपीटीवर जाणाऱ्या लेनवर नगिना ढाब्याच्या समोर होंडा सिटी गाडीला अपघात होऊन यात दोघेजण ठार झाल्याची घटना घडली आहे.

होंडा सिटी गाडी (एमएच ०१ बीजी २१८८) घेऊन चैतन्य फडाळे (वय २५, रा. सानपाडा) हा भरधाव वेगाने जात असताना अपघात झाला. या अपघातात चैतन्य फडाळे व त्याच्यासोबत दृष्टी खाडे (२४ रा. भांडूप) ही गंभीररित्या जखमी होऊन तिचाही मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# मिशन लोकसभा : एनडीएतील घटक पक्षांची समन्वय समिती होणार स्थापन

**मुंबई : प्रतिनिधी**

महायुतीमधील तीनही घटक पक्षांच्या समन्वय समितीची बैठक मंगळवारी (दि. १२) उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या निवासस्थानी झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी लोकसभा निवडणुकीच्या ४८ लोकसभा मतदारसंघावर पूर्ण लक्ष केंद्रीत करण्याचे ठरले आहे. प्रत्येक लोकसभा मतदारसंघात समन्वय करण्यासाठी तीनही पक्षासह एनडीएतील इतर घटक पक्षाच्या नेत्यांची सर्वसमावेशक समन्वय समिती बनविण्यासाठीचा निर्णय घेण्यात आला.

याबाबत माहिती देताना आमदार ॲड. आशिष शेलार म्हणाले की, भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही पक्षांचे प्रमुख नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनानुसार ही बैठक मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या बंगल्यावर झाली. लोकसभा निवडणुकीचा विचार करीत राज्यांमध्ये ४८ लोकसभा क्षेत्रांवर पूर्ण लक्ष केंद्रित करून ४५पेक्षा जास्त जागा निवडून येण्यासाठी समन्वयाची जबाबदारी समितीबरोबर अन्य नेत्यांवर असेलच, पण त्याबरोबर प्रत्येक लोकसभा क्षेत्रामध्ये तिन्ही पक्षांबरोबर एनडीएतील अन्य घटक पक्ष या सगळ्यांबरोबरची एक समन्वय समिती करण्याचा निर्णय झाला. त्यासाठी नावाचा विचार झाला. अंतिम निर्णय तिन्ही पक्षाचे वरिष्ठ नेते करतील.

२८८ विधानसभा क्षेत्रामध्ये आम्ही घटक पक्षांबरोबर निवडणुकांचा विचार करीत आहोत. त्यामध्ये सुद्धा एक विधानसभा क्षेत्र, एक सर्वव्यापी टीम अशी कोअर ग्रुप प्रत्येक विधानसभानुसार करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात होत असून महायुतीचा निर्णय आम्ही घेतलेला आहे. विधिमंडळामध्ये ज्या विविध समित्या असतात आणि या सर्व विधान परिषदेच्या आणि विधानसभेच्या समित्यांच्या बाबतीत सुद्धा त्याबद्दल आवश्यक नावे आवश्यक कोटा आणि आवश्यक विभागणी याच्यावर एकमत झाले. तोही निर्णय काही दिवसांत घोषित होईल. असे आमदार ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.


या वेळी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ, चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, दिलीप वळसे-पाटील, दादा भुसे, धनंजय मुंडे, आमदार प्रसाद लाड आणि आशिष कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# कांदळवन संवर्धनाच्या तक्रारींचे तत्काळ निवारण करावे -डॉ. महेंद्र कल्याणकर

**नवी मुंबई : बातमीदार**

कांदळवन संरक्षण व संवर्धनाच्या अनुषंगाने शासकीय यंत्रणांनी समन्वय ठेवून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे तत्काळ निवारण करून कांदळवनाच्या संरक्षणासाठी विशेष प्रयत्न करावे, अशा सूचना कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी बैठकीत उपस्थित यंत्रणांना दिल्या.

कोकण विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात कांदळवन संरक्षण व संवर्धनाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस अप्पर प्रधान वनसंरक्षक (कांदळवन) एस. व्ही. रामराव हे दूरदृश्य प्रणालीव्दारे उपस्थित होते, तसेच सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष अनिता पाटील, पोलीस उपअधीक्षक (गृह) संजय सावंत, सहाय्यक आयुक्त पोलीस जितेंद्र जावळे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे



उपप्रादेशिक अधिकारी रुपाली सोनकांबळे आदी उपस्थित होते.

या बैठकीत कांदळवन क्षेत्र वनविभागास हस्तांतरीत करणे, नोडल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबत चर्चा करणे, डेब्रिज हटवून निश्चित ठिकाणी टाकणे, कांदळवन संरक्षण व संवर्धनाच्या अनुषंगाने सर्व शासकीय यंत्रणा, संस्था, अधिकाऱ्यांच्या अधिकार व जबाबदाऱ्यांचा तत्पर व परिणामकारक वापर करून घेणे, तसेच सर्व शासकीय यंत्रणांमध्ये योग्य समन्वय ठेवण्याच्या सूचना डॉ. कल्याणकर यांनी दिल्या.

संवेदनशील कांदळवन क्षेत्रास बाधा पोहचविण्याच्या उपद्रवींवर नजर ठेवण्यासाठी सीसीटीव्ही बसविण्याबाबत निर्णय घेण्यात आला. राज्यातील कांदळवन क्षेत्राचे दर सहा महिन्यांनी उपग्रहाद्वारे उच्च पृथ्थकरण वापरुन नकाशे तयार करुन घेणे व त्यानुसार काही बदल आढळून आल्यास तो समितीने विचारात घेऊन त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

# पेणमधील लोकअदालतीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पेण : प्रतिनिधी**

पेण येथील दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर येथे शनिवारी लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. लोकअदालतीला पक्षकारांची लक्षणीय उपस्थिती होती. पेण विधी सेवा समितीच्या अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश क स्तर पेण रुबिना एन. मुजावर व दिवाणी न्यायाधीश क स्तर पेण प्रितेश देशपांडे यांनी लोकअदालतीची संकल्पना समजावून सांगितली.

प्रमुख दिवाणी न्यायाधीश रुबिना मुजावर यांचेकडील एक प्रकरणातील जोडप्याचा संसार पुन्हा फुलविण्यात आला, तसेच प्रलंबित प्रकरणांपैकी १२३ दिवाणी दावे तसेच फौजदारीकडील ३९३ फौजदारी प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली. त्यापैकी दिवाणीकडील १९ प्रकरणे व फौजदारीकडील १४९ प्रकरणे तडजोडीने निकाली करण्यात आली. वादपूर्व ४,४३२ खटल्यांपैकी वादपूर्व ६७४ खटल्यामध्ये तडजोडी करण्यात आली. ६८ लाख ७३ हजार १४४ रुपये वसुली करण्यात आली.

सरकारी वकिल सतिश नाईक, ॲड. बी. व्ही. म्हात्रे अध्यक्ष वकील संघटना पेण, सहाय्यक अधीक्षक श्रावणी मोरे, अमिता ठाकूर, कनिष्ठ लिपीक पंढरी हरणे व प्रविण सित्रे यांनी कामकाज पाहिले. पंच म्हणून ॲड. संदेश गावंड व ॲड. दिपाश्री पाटील उपस्थित होते.



## माणगाव येथील जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

**माणगाव** : मोर्बा नाका येथे गल्लीत अवैधरीत्या सुरू असलेल्या मटका जुगार अड्ड्यावर पोलिसांनी सोमवारी (दि. ११) धाड टाकून जुगाराचे साहित्य व रोख रक्कम जप्त करून एका आरोपीवर गुन्हा दाखल केला.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, मोर्बा नाका येथील खराडे सलूनच्या शेजारी असलेल्या गल्लीत कल्याण व डे महाराष्ट्र नावाचा मटका जुगार आरोपी मधुकर दत्ताराम मुकम (वय ४०, रा. खर्डी खुर्द) हा लोकांकडून पैसे घेऊन खेळत असताना आढळला. येथून पोलिसांनी रोख १२७० रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले. गुन्ह्याची नोंद पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवलदार सानप हे करीत आहेत.

# डासांची पैदास रोखून आजारांना घाला आळा!

सध्या डेंग्यू या आजाराची साथ जोरात पसरली आहे. डेंग्यू हा रक्त शोषणाऱ्या डासांच्या माध्यमातून होणारा विषाणूजन्य आजार आहे. प्रामुख्याने डासांची एडिस इजिप्ती ही प्रजाती डेंग्यू पसरवण्यास कारणीभूत असते बऱ्याच जणांना वाटते, रस्त्यावर विशेषतः गटारामध्ये धूर फवारणी केली की, डास नष्ट होतात. उलटपक्षी गटारात धूर फवारणी करणे म्हणजे बाहेरच्या शत्रूला घरात घेणे.

गटारात असलेल्या डासांमुळे हत्तीरोगसारखे आजार होऊ शकतात, पण त्याचे प्रमाण अगदी नगण्य आहे. डेंग्यूच्या डासांची पैदास साचलेल्या स्वच्छ पाण्यात होते. धूर फवारणी किंवा कीटकनाशक औषधांची फवारणी ही प्रत्येक घरात आणि विशेषतः इमारतीचे जिने, मीटर बॉक्स रुम, जिथे काळोख असतो अशा ठिकाणी केली पाहिजे कारण या ठिकाणी हे डास दिवसा विश्रांती घेत असतात. डेंग्यू पसरवणाऱ्या अळ्या किंवा एडिस इजिप्ती प्रजातीचे डास साचलेल्या स्वच्छ पाण्यात तयार होतात. यासाठी आपण काळजी घेतली पाहिजे. घरात एसी, फ्रीजखाली साचलेलं पाणी, कूलर, कुंड्या, बादल्या, जुने टायर, पावसाळ्यात लावलेल्या प्लास्टिक ताडपत्री इमारतीच्या टेरेसवर असलेल्या टाकाऊ वस्तू, चायनीज बांबू लावलेल्या फुलदाण्या, यांच्याकडे विशेष लक्ष ठेवा. एका बाटलीच्या झाकणामध्ये खूप दिवस पाणी साचले तरी त्यामध्ये हजारो डासांची पैदास होते. यावरून आपण योग्य तो धडा घेतला पाहिजे. मागे एका व्यवसायाने इंजिनिअर असलेल्या एका कुटुंबाच्या घरात सर्वांनाच डेंग्यूची लागण झाली होती. त्यावेळी त्या घराचा आम्ही सर्व्हे करीत होतो. त्यावेळी घर तर स्वच्छ दिसत होते. मग डासांची उत्पत्ती कुठे झाली असेल याचा शोध घेत होतो. त्यावेळी लक्षात आले की, त्यांच्या घरातील टॉयलेटवर असलेल्या पाण्याच्या टाकीवर असलेले झाकण व्यवस्थित बसलेले नव्हते आणि त्या टाकीमध्ये या डासांची उत्पत्ती झाली होती, परंतु या छोट्याशा चुकीमुळे त्यांच्या घरातील दोन जीव गमवावे लागले होते. त्यामुळे प्रत्येकाने काळजी घेणे आवश्यक आहे. खूप दिवस पाणी जमा होणार नाही, याची काळजी घ्या.



डेंग्यू हा रक्त शोषणाऱ्या डासांच्या माध्यमातून होणारा विषाणूजन्य आजार आहे. डेंग्यूवर ठराविक असे उपचार किंवा औषध उपलब्ध नाही, पण लवकर निदान झाल्यास आणि वेळीच उपचार मिळाल्यास यावर नियंत्रण मिळवता येऊ शकते. रुग्णाला त्याच्या लक्षणांनुसार म्हणजे ताप किंवा अंगदुखी पाहून तशी औषधे दिली जातात. जर प्रकृती गंभीर असेल तर रुग्णालयात भरती करावे लागू शकते. डेंग्यूच्या रुग्णाला विश्रांतीची सर्वांत जास्त गरज असते, तसेच भरपूर पाणी पिण्याचीही, म्हणजे अंदाजे दिवसाला तीन लीटर पाणी प्यायला हवे. रुग्णाने साधा आहार घ्यावा. कुठलाही ताप साधा समजू नका. ताप आल्यास त्वरीत तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

डेंग्यूचे डास दिवसा चावतात किंवा ते फार कमी उंचीवर उडतात या भ्रमात राहू नका. त्यांनीसुद्धा आपल्या जीवनशैलीत बदल केला आहे. त्यामुळे डास चावणार नाहीत किंवा डासांची उत्पत्ती कशी रोखता येईल, याची काळजी घ्या.

**-डॉ. अरुणकुमार भगत,**
**माजी नगरसेवक,**
**पनवेल महापालिका**

## निवडक

### अपघातात एकाचा मृत्यू; सहकारी जखमी

**पनवेल :** अज्ञात वाहनाच्या धडकेने एकाचा मृत्यू व त्याचा सहकारी जखमी झाल्याची घटना खारघरमध्ये घडली आहे. खारघरमध्ये सुताराचे काम करणारे देवीलाल कामी व आकाश विश्वकर्मा हे दोघे मोटरसायकलवरून जात असताना वाहनाने त्यांना धडक दिली. या अपघातामध्ये देवीलाल याचा मृत्यू झाला असून, आकाश गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### सोनसाखळीसह मोबाईलही पळविला

**पनवेल :** रेल्वे प्रवाशांचे मोबाइल व दागिने चोरी करण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. दोन दिवसात चार प्रवाशांचे मोबाइल व सोनसाखळी चोरल्याची घटना घडली आहे. पनवेल येथील सुनील शिंत्रे हे ठाणे नेरूळ रेल्वेने प्रवास करत असताना चोरट्यांनी त्यांची २४ हजार रुपये किमतीची सोनसाखळी चोरून नेली. तसेच पनवेल येथे राहणारे सुदर्शन केळशीकर घणसोलीमध्ये एका कार्यक्रमास गेले होते. पहाटे साडेतीन वाजता घणसोली रेल्वे स्टेशनमध्ये गाडीची वाट पाहात असताना चोरट्यांनी त्यांच्या हातामधील १७ हजार रुपये किमतीचा मोबाइल हिसकावून नेला. जुईनगर येथील युवक अजय बिंद व सतीश तिरमारे याचा मोबाइलही हार्बर मार्गावर प्रवास करत असताना चोरीला गेला आहे. याविषयी वाशी रेल्वे पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे.

### खारघरमधील गो शाळेत चोरी

**पनवेल :** गो शाळेतून मोबाईल व रोख रक्कम अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना खारघरमध्ये घडली आहे. खारघरमधील आईमाता मंदिर गो शाळेत चोरी झाली आहे. चोरट्यांनी रात्री गोशाळेच्या भिंतीवरून आतमध्ये येऊन गोरक्षकांचे दोन मोबाईल व रोख रक्कम चोरून नेली आहे. याविषयी खारघर पोलीस स्टेशनमध्ये घरफोडीचा गुन्हा दाखल झाला आहे.

### कळंबोलीत मोबाइल हिसकावला

**पनवेल :** मोटरसायकलवरून आलेल्या चोरट्यांनी एका व्यक्तीचा किमती मोबाईल हिसकावून ते पसार झाल्याची घटना कळंबोली वसाहतीमध्ये घडली आहे. कळंबोली येथे राहणारा दीपक बौरा हा तरुण जेवण घेण्यासाठी हॉटेलमध्ये गेला होता. तेथून सिडको बिल्डिंग चौकात आला असताना केटीएम मोटरसायकलवरून आलेल्या चोरट्यांनी त्यांच्या हातामधील ४५ हजार रुपये किमतीचा मोबाईल हिसकावून नेला आहे. याबाबतची तक्रार करण्यात आली आहे.



**पनवेल : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यास महापालिकेतर्फे सुरुवात करण्यात आली आहे. माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी या कामाची पाहणी केली. या वेळी महापालिकेचे अधिकारी प्रकाश दोडे, अभियंता किरण पाटील, आर.ई.इन्फ्रा प्रा.लि.चे अभियंता निशिकांत जाधव आदी उपस्थित होते.**

# पनवेलमध्ये वाहतूक कोंडीवर उपाययोजना

## महापालिकेतर्फे आदई सर्कल, स्वर्णगंगा चौकात सिग्नलची उभारणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून दोन ठिकाणी सिग्नल व्यवस्था उभारण्यात आली आहे. यामध्ये प्रथमत: आदई चौकामध्ये सिग्नल बसविण्यात आला आहे.



पनवेल-माथेरान रस्त्यांवरील आदई चौकातून पनवेल शहराकडे मोठ्या प्रमाणात वाहनांची येजा सुरू असते. सकाळी व संध्याकाळी याठिकाणी विविध कंपन्याच्या बसेस, तसेच चाकरमान्याच्या गाड्यामुळे वाहनांची वर्दळ वाढल्यामुळे या चौकात सातत्याने वाहतुक कोंडी होत होती. तसेच या भागामध्ये वाढत्या लोकसंख्यामुळे वाहनांची येजाही मोठ्याप्रमाणात वाढली आहे. त्यामुळे या चौकामधून भरधाव वेगाने वाहनांची येजा सुरू असते. दरम्यान, अपघात होण्याची शक्यताही नाकारता येत नव्हती. महापालिकेने ही समस्या दूर करण्यासाठी विद्युत विभागाच्या माध्यमातून नुकतीच आदई चौकामध्ये सिग्नल जंक्शनची उभारणी केली आहे. या सिग्नल उभारणीमुळे येथील वाहतुक कोंडी कमी झाली असून वाहतुक व्यवस्थित होऊ लागल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

याचबरोबर खारघर क्षेत्रातील सेक्टर १५ येथील स्वर्णगंगा चौक कोपरागावाकडे जाणाऱ्या सायन-पनवेल महामार्गास जोडण्यात आला आहे. या चौकामधून मोठ्याप्रमाणात खारघर शहराकडे वाहनांची ये-जा सुरू असते. या चौकामध्ये वाहनांची संख्या वाढली असल्याकारणाने याठिकाणी वारंवार वाहतुक कोंडीची समस्या उद्भवत होती. या चौकामधून सायन-पनवेल महामार्गाकडे जाताना भरधाव वेगाने वाहनांची येजा सुरू असते. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व वाहतुकीचे नियमन करण्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागच्या दृष्टीने सिग्नल जंक्शन स्थापित करण्यात आले आहे.

पनवेल महापालिका हद्दीमध्ये वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी नुकतेच आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरीक्त आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या सूचनेनूसार आदई सर्कल व स्वर्णगंगा चौकामध्ये याठिकाणी महापालिकेने सिग्नलची उभारणी करण्यात आली आहे. या सिग्नल व्यवस्थेमुळे स्वर्णगंगा चौक वआदई सर्कल चौकामध्ये नित्य नेमाने होणारी वाहतुकीची कोंडी सुटली आहे.

> **विद्युत विभागाच्या माध्यमातून महापालिका कार्यक्षेत्रात सध्या विविध कामे हाती घेतली आहेत. सिडको हस्तांतरीत भागात जुने पारंपारिक दिवे बदलून नवीन एलईडी दिवे लावण्यात आले आहेत. याचबरोबरीने काही महत्त्वांच्या चौकांमधील वाहतुकीची कोंडी लक्षात घेऊन आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली सिग्नल जंक्शन उभारण्यात आले आहे. या सिग्नल जंक्शनमुळे वाहतुकीला शिस्त लागणार आहे.**
>
> **-प्रितम पाटील, विभागप्रमुख विद्युत विभाग, पनवेल महापालिका**

## 'कर्मवीरांचे जीवनकार्य सदैव प्रेरणादायी'



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची संस्थेप्रती जीवननिष्ठा व त्यांचे जीवनकार्य महाराष्ट्रातील तमाम बहुजनांसाठी अत्यंत प्रेरणादायी असून विद्यार्थ्यांनी अण्णांच्या विचारांशी आणि आपले जीवन घडविणाऱ्या रयत शिक्षण संस्थेशी सदैव प्रामाणिकपणे एकरूप होऊन संस्थेचा नावलौकिक अधिक उंचवावा, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज मधील उपशिक्षक सागर रंधवे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील येथील मॉडर्न स्कूल व ज्युनिअर कॉलेज मध्ये आयोजित 'कर्मवीर जयंती सप्ताहांतर्गत' कर्मवीर अण्णांच्या जीवन कार्याविषयी व्याख्यान देताना सागर रंधवे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मॉडर्न स्कूलच्या प्राचार्य सुमित्रा भोसले होत्या.

या वेळी आपल्या व्याख्यानात सागर रंधवे यांनी कर्मवीर अण्णांची जीवन कहाणी आणि त्यांच्या जीवनातील निवडक प्रसंग विद्यार्थ्यांना सांगून अण्णांच्या महान शैक्षणिक कार्याची व्याप्ती विशद केली. विद्यार्थ्यांनी आपली आत्मसंवेदना सदैव जागृत ठेवून भविष्यात संस्था हिताला प्राधान्य द्यावे अशी अपेक्षा व्यक्त करून गुणवत्तापूर्ण यश संपादनासाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या सुमित्रा भोसले यांच्यासह उपशिक्षक विभाग प्रमुख आबासाहेब वाघ आणि मोरे मॅडम तसेच उपशिक्षक तुषार म्हात्रे, पंढरीनाथ माळी व अन्य शिक्षक तसेच विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बी. एम. कांबळे यांनी केले तर पंढरीनाथ माळी यांनी आभार मानले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात मंगळवारी (दि. १२) स्पर्धा परीक्षा समितीतर्फे महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.



या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून विजेंद्र शितोळे (समन्वयक, सीडी देशमुख स्पर्धा परीक्षा केंद्र सिकेटी महाविद्यालय पनवेल) व वसीम खान हे यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना वेगवेगळ्या स्पर्धा यशस्वीरित्या उत्तीर्ण होण्यासाठी लागणारी कौशल्ये, तंत्रे, अभ्यास पद्धती व गती तसेच संकल्पना स्पष्टता आणि गती याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून वेगवेगळ्या क्षेत्रात करिअर विषयी असणाऱ्या संधी तसेच निवड प्रक्रिया याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करायची व एक कर्तव्यदक्ष अधिकारी कसे बनायचे याविषयी मार्गदर्शन केले व सत्रासाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सत्राचे आयोजन प्रा. डॉ. कविता पाटील (समन्वयक, स्पर्धा परीक्षा समिती) व प्रा. रूपाली नागरेकर, प्रा. योगिता पाटील, प्रा. कावेरी घोगरे, प्रा. विशाल देशमुख व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. या सत्रासाठी प्रा. महेश्वरी झिरपे (समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष) तसेच सर्व विभागाचे विभाग प्रमुख , सर्व प्राध्यापक हे सर्व उपस्थित होते. या सत्राचे सूत्रसंचालन व आभार प्रा. महेश धायगुडे यांनी मानले.

## उरणमध्ये भाजप महिला मोर्चातर्फे मंगळागौर स्पर्धा

**उरण : वार्ताहर**

भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा उरण यांच्या वतीने मंगळागौर स्पर्धा २०२३ रविवारी (दि. १०) जेएनपीटी मल्टी पर्पज हॉल टाउनशिप उरण येथे आयोजन करण्यात आले.



स्पर्धेत प्रथम पारितोषिक क्रमांक आलेल्या महिला मंडळास ७७७७ रोख रक्कम व भव्य ट्रॉफी मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले त्याचप्रमाणे द्वितीय क्रमांक आलेल्या महिला मंडळास ५५५५ रुपये रोख रक्कम व भव्य ट्रॉफी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले त्याचप्रमाणे, तृतीय क्रमांक आलेल्या महिला मंडळास पारितोषिक म्हणून ३३३३ रुपये रोख रक्कम व ट्रॉफी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. एकूण १३ महिला ग्रुपनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेचे परीक्षण श्लोक पाटील, दर्शना माळी व रात्रीत खेळ चाले सिरीयल मधील (वच्छी) फेम संजीवनी पाटील यांनी केले. आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला.

या वेळी जिल्हाध्यक्ष महिला मोर्चा उत्तर रायगड अश्विनी पाटील, केंद्रीय संपर्क प्रमुख महिला मोर्चा संध्या शारबिद्रे, उपाध्यक्षा संगीता पाटील, चिटणीस चारुशीला घरत, पनवेल तालुका अध्यक्ष रत्ना घरत, उरण तालुका अध्यक्ष ॲड. राणी म्हात्रे, सरचिटणीस निर्मला घरत, उरणच्या माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे, उरण शहर अध्यक्ष संपूर्णा थळी, माजी नगरसेविका जान्हवी पंडित, माजी नगरसेविका रजनी कोळी, सरपंच, उपसरपंच, सदस्य, जिल्हा परिषद सदस्य आदी उपस्थित होते. दरम्यान, स्पर्धेत भाग घेणाऱ्या प्रत्येक महिलेस गिफ्ट देण्यात आले.

## भाजप पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन अन् शुभेच्छा!










**पनवेल : भाजप नवनियुक्त कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, उपाध्यक्ष प्रिया मुकादम, उत्तर भारतीय संयोजक संतोष शर्मा, सहकार सेल संयोजक अशोक मोटे, कायदा सेल संयोजक राजेंद्र अग्रवाल यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक बबन मुकादम, खारघर शहर सरचिटणीस दीपक शिंदे, दिलीप बिस्ट, अजय माळी, संदीप रेड्डी, मुकेश गर्द, शैलेद्र त्रिपाठी, अमित बोधाई, स्नेहल बोधाई, प्रिती शर्मा, मुर्शफ आदी उपस्थित होते.**











**पनवेल : मुंबई-गोवा महामार्गाच्या पाहणीसाठी आलेल्या सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी भाजप उत्तर रायगड जिल्हा अंतर्गत विविध पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. शासकीय विश्रामगृहात भाजपचे मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, कर्जत तालुका अध्यक्ष राजेश भगत, अशोक मोटे, उत्तर भारतीय सेलचे संयोजन संतोष शर्मा, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, भूपेंद्र पाटील, अमरीश मोकल, चिन्मय समेळ, देवांशु प्रभाळे आदी उपस्थित होते. या वेळी मान्यवरांच्या हस्ते २०२४ सालच्या सनातन पंचांगचे प्रकाशन करण्यात आले.**

## संपादकीय

# ढोलकीच्या तालावर

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील सौहार्दाचे दर्शन जी-२० परिषदेच्या निमित्ताने साऱ्या जगाला झाले. राष्ट्राध्यक्ष बायडन यांचे पंतप्रधानांनी केलेले आतिथ्य वाखाणण्याजोगे होतेच. परिषदेची फलश्रुती आणि आयोजन याबद्दल पंतप्रधान मोदी यांची पाठ थोपटून मगच बायडन रवाना झाले. परंतु पुढे व्हिएतनाम येथील पत्रकार परिषदेत मात्र त्यांनी किंचितसा वेगळा सूर लावल्याने येथील मोदीविरोधकांना आयतेच कोलित मिळाले.

**प्रत्येक मराठी माणसाला माहित असलेले ढोलकी हे वाद्य दोन्ही बाजूंनी वाजते. अर्थात, एका गावात ढोलकी वेगळी वाजते आणि दुसऱ्या गावात फड उभा राहिला की वेगळेच बोल काढते असे काही नाही, परंतु राजकारणातील काही ढोलकीबहाद्दर वेगवेगळे बोल काढू शकतात. जे ग्रामीण राजकारणात घडते, तसाच प्रकार आंतरराष्ट्रीय पातळीवरील महानेत्यांकडूनही होतो याचे प्रत्यंतर नुकतेच आले. राजधानी दिल्लीमध्ये नुकतीच झालेली जी-२० परिषद अतिशय यशस्वी झाली. देशोदेशीचे नेते जातीने उपस्थित राहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजनैतिक कौशल्यावर फिदा होऊन गेले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अत्यंत कौशल्याने आणि द्रष्टेपणाने जी-२० परिषदेची आखणी केलेली होती. भारताला यंदा मिळालेले यजमानपद त्यांनी शतप्रतिशत सत्कारणी लावले. परिषदेच्या निमित्ताने दोन दिवस अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांचाही राजधानी दिल्लीत मुक्काम होता. दिल्लीतच अमेरिकेचा प्रचंड मोठा दूतावास आहे, परंतु या काळात बायडन यांनी परिषदेच्या कार्यक्रमांना प्राधान्य दिले आणि वार्तालाप, मुलाखती, पत्रकार परिषदा असे कार्यक्रम टाळले. वास्तविक आंतरराष्ट्रीय परिषदा जेथे होतात तेथे अशीच पद्धत आहे. कारण अशा परिषदांमध्ये होणारे करार-मदार, चर्चा-विमर्श यांचा थेट परिणाम नजीकच्या भविष्यातील आंतरराष्ट्रीय व्यवहारांवर होत असतो. राजनैतिक व्यवहारामध्ये तोलून-मापून बोलावे लागते. अनौपचारिक मुलाखतींना तेथे स्थान नसते. म्हणूनच कदाचित बायडन यांनी पत्रकारांसोबत वार्तालाप टाळले असावेत. त्यात गैर असे काहीही नाही, परंतु अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष दिल्लीहून व्हिएतनामला गेले. तेथे हनोई या राजधानीच्या शहरात मात्र त्यांनी पत्रकार परिषद घेतली. 'माझे मित्र पंतप्रधान मोदी यांच्याशी अनेक विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. अनेक विषयांसोबत माध्यमस्वातंत्र्य आणि मानवीहक्क या मुद्यांवरदेखील मी बोललो. तसे मी नेहमीच करतो. इथून पुढील काळात भारत आणि अमेरिका यांच्यातील मैत्रीचे संबंध अधिकच दृढ होताना दिसतील', असे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. बायडन यांना भारतातील माध्यम स्वातंत्र्याबद्दल किंवा मानवी हक्कांच्या जतनाबद्दल बोलायचेच होते तर त्यांनी भारतातच असताना अशी टीकाटिप्पणी केली असती तरी चालले असते. जी-२० परिषदेसाठी जमलेल्या आंतरराष्ट्रीय पत्रकारांसमोर त्यांनी वक्तव्ये करायला हवी होती. तसे न घडल्याने काँग्रेसच्या हातात आयतेच कोलित मिळाले. 'न बोलूंगा, न बोलने दूंगा' असा पंतप्रधान मोदी यांचा खाक्या आहे, अशी टीका काँग्रेसकडून करण्यात आली. म्हणजेच बायडन यांना पत्रकारांना भेटू न देण्याचा डाव पंतप्रधान मोदी यांचाच होता आणि त्यांनी तो तडीस नेला असे विरोधकांना सूचित करायचे आहे. जी-२० परिषदेची फलश्रुती पाहता निर्भेळ आंतरराष्ट्रीय यश भारताच्या पदरी पडले ही बाब विरोधकांपैकी अनेकांना पचनी पडणारी नाही. पंतप्रधान मोदी यांना जी-२० परिषदेच्या यशस्वितेचे श्रेय मिळाल्यामुळे देशातच अनेकांचा पोटशूळ उठला. त्या वेदनेतूनच राजकीय ढोलकीचे हे बोल वाजू लागले आहेत असे दिसते.**

# 'सारथी'च्या माध्यमातून राज्यात विविध उपक्रम, योजना

समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी राज्य शासन कटीबद्ध आहे. महाराष्ट्रातील विविध जातसमूहांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामिल करून घेण्यासाठी, त्यांचे आर्थिक आणि सामाजिक जीवनमान उंचावण्यासाठी विविध महामंडळ निर्माण करून त्या माध्यमातून विकासाच्या प्रभावी योजना, उपक्रम राबविण्यात येतात. राज्य शासनाने मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या व तरुणांच्या प्रगतीसाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे सारथीची स्थापना केली आहे. सारथीच्या माध्यमातून राज्यात विविध कल्याणकारी उपक्रम, योजना व्यापक स्वरुपात राबवण्यात येत आहेत.

राज्य शासनाच्या नियोजन विभागांतर्गत स्वायत्त संस्था म्हणून छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, अर्थात सारथी कार्यरत आहे. शासनाकडून या संस्थेस भरीव निधी प्राप्त होत असून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ३०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. या संस्थेचे मुख्यालय पुणे येथे असून उपकेंद्र कोल्हापूर येथे कार्यरत आहे. त्यासोबतच सारथीचे राज्यात आठ विभागीय कार्यालये कोल्हापूर, खारघर नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती व नागपूर या ठिकाणी कार्यरत आहेत. या संस्थेमार्फत मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या प्रवर्गाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी विविध कल्याणकारी योजनांची कालबध्द तऱ्हेने व प्रभावीपणे अंमलबाजावणी करण्यात येते.

सारथी संस्थेमार्फत आजपर्यंत एक लाख ३३ हजार २३६ विद्यार्थ्यांनी विविध योजनांचा लाभ घेतला आहे. पीएच.डी विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती विभागात दोन हजार १०९ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला असून स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण विभागात २५ हजार १०७ तर शिक्षण विभागातंर्गतच्या योजनांचा २५ हजार १३७ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे. तर कौशल्य विकास प्रशिक्षण विभागांतर्गत २० हजार ७४३ लाभार्थ्यांना तर सारथीच्या इतर उपक्रमातंर्गत ६० हजार १४० जणांना फायदा झालेला आहे.

**महाराणी ताराराणी स्पर्धा परीक्षा विभाग**

या उपक्रमातंर्गत सारथीमार्फत युपीएससी, एमपीएससी स्पर्धा परिक्षांच्या पूर्व, मुख्य तसेच मुलाखत या तीन्ही टप्प्यांवर विद्यार्थ्यांना तयारीसाठी प्रशिक्षण सहाय्य करण्यात येते. युपीएससीच्या पूर्व परिक्षेसाठी पाचशे विद्यार्थी दरवर्षी निवडण्यात येतात. नवी दिल्ली येथील प्रशिक्षणासाठी विद्यार्थांना दरमहा १३ हजार व पुणे येथील विद्यार्थ्यांना दरमहा एक हजार रुपये




विद्यावेतन दिले जाते. तसेच प्रशिक्षण संस्थेचे शुल्क सारथीमार्फत भरण्यात येते. मागील तीन वर्षांत एक हजार ४७९ विद्यार्थ्यांना पूर्व परीक्षेसाठी २१ कोटीचा लाभ डिबिटी द्वारे देण्यात आला आहे. युपीएससी मुख्य परिक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना पन्नास हजार रुपये एकरकमी दिले जातात. सारथी मुख्यालयातून विद्यार्थ्यांना झूम मिटींगद्वारे मार्गदर्शनही करण्यात येते. त्यांच्या जर काही अडचणी, समस्या असतील तर त्या सोडवण्यात येतात. मागील तीन वर्षांत साडेसहाशे विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेसाठी ३.२५ कोटीचा लाभ डिबीटीद्वारे देण्यात आला आहे. तर मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना पंचवीस हजार रुपये एकरकमी दिले जातात. मागील तीन वर्षात २०६ विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी रुपये ५१ लाखाचा लाभ डिबीटीद्वारे देण्यात आला आहे.

**यशस्वीता**

युपीएससी परिक्षांमध्ये सारथीमधील ५१ विद्यार्थ्यांची युपीएससी परीक्षेत निवड झालेली आहे. तर भारतीय वन सेवेसाठी सारथी संस्थेतील दोन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. तसेच युपीएससी सीएपीएफ सेवेसाठी संस्थेतील पाच विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. युपीएससी प्रमाणेच राज्य सेवा परिक्षा अर्थात एमपीएससीमध्ये ही सारथीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, कोचींग सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. मागील तीन वर्षांत ११२५ विद्यार्थ्यांना पूर्व परिक्षेसाठी ८.२६ कोटीचा लाभ डिबीटीद्वारे देण्यात आला आहे.मुख्य परिक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना १५ हजार एक रकमी दिले जातात. आत्तापर्यंत मागील तीन वर्षात ७३६७ विद्यार्थ्यांना मुख्य परिक्षेसाठी अकरा कोटी रुपयांचा लाभ डिबीटीद्वारे देण्यात आला आहे. तसेच मुख्य परिक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना दहा हजार रुपये एकरकमी दिले जातात.

डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती सन २०२२-२३ मध्ये तीनशे विद्यार्थी निवडीसाठीची जाहीरात जूलै २०२२ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली असून यामधील १५३ पात्र विद्यार्थ्यांची यादी सारथीच्या संकेतस्थळावर एप्रिल २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत मुलामुलींना परदेश शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना या वर्षापासून सुरू करण्यात येत असून चार जूलै २०२३ रोजी मंत्रीमंडळाने या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. यासाठीची जाहिरात ऑगस्ट २०२३ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली असून ७५ अर्ज प्राप्त झाले आहेत.

छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृती अतंर्गत सारथी मार्फत लक्षित गटातील उच्च शिक्षित विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे अथवा विकसित करणे. संशोधन पुर्ण होईपर्यंत परंतू कमाल पाच वर्षाच्या कालावधी करिता संशोधन प्रगती अहवालाच्या आधारे प्रतिमाह ३१,००० रुपये अधिछात्रवृत्ती देण्यात येते. यामध्ये २०१९ ते २०२३ या कालावधीत एकुण २१०९ विद्यार्थांचा सहभाग आहे.

कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम २०२२-२३ मध्ये छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्व विकास संगणक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येतो. १ फेब्रुवारी २०२३ पासून प्रशिक्षणास सुरवात करण्यात आली असून यामध्ये ऑनलाईन प्राप्त झालेल्या एकूण ३६,५२५ अर्जांपैकी अंतिम छाननीतुन सारथी संस्थेने मान्यता दिलेल्या अर्जांची संख्या २७,३४६ इतकी आहे.

छत्रपती राजाराम महाराज-सारथी शिष्यवृत्ती २०२२-२३ योजना मध्ये एकूण ३१.२३ कोटी रुपये वाटप करण्यात आले आहे. यासाठी इयत्ता ९ वी व ११ वी मध्ये पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण, दहावी मध्ये ६० टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. सारथी संस्थेने वरील अटीसह उत्तीर्ण झालेल्या व केंद्राच्या कोट्यामुळे शिष्यवृत्ती अप्राप्त असणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा ८०० रुपयांप्रमाणे वार्षिक ९६०० रुपयांप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते. तर मुख्यमंत्री विशेष संशोधन अधिछात्रवृत्ती (CMSRF)- सारथी मार्फत लक्षित गटातील उच्च शिक्षित विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी ही योजना राबवण्यात येते.

**शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम**

सन २०२२-२३ पासून ही योजना सारथीतर्फे राबवण्यात येते. यामध्ये वार्षिक लाभार्थी संख्या २५०० इतकी असून फलोत्पादन उत्पादन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण, कापनीनंतरचे प्रशिक्षण, यामध्ये सामान्य हरितगृह व्यवस्थापन,शेड नेट हाऊस व्यवस्थापन, वनस्पती प्रसार आणि भाजीपाला रोपवाटिका व्यवस्थापन याबाबत पाच दिवसाचे प्रशिक्षण दिल्या जाते. शेतकरी उत्पादन कंपनी प्रशिक्षण कार्यक्रम २०२३-२४ योजनेचा कार्यारंभ आदेश जानेवारी २०२३ रोजी देण्यात आला आहे. प्रवेशासाठी ऑनलाईन पोर्टल तयार करण्याचे कामकाज एमसीडीसी स्तरावर सुरू असून ऑक्टोबर २०२३ पासून प्रशिक्षणाचे राज्यातील २६ ठिकाणी सुरवात करण्यात येईल. याचे वार्षिक लाभार्थी हजार असणार आहेत.

सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत ३५ सेक्टरचा समावेश आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मुंबई यांच्यामार्फत राजमाता जिजाऊ कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्याचे प्रयोजन आहे.

या संस्थेमार्फत वीस हजार विद्यार्थ्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण सुरू करण्याच्या अनुषंगाने डिसेंबर २०२२ रोजी सामंजस्य करार करुन कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाची माहिती देण्यासाठी सहाय्यक आयुक्त (कौशल्य विकास) यांना सूचित करण्यात आले आहे. विद्यार्थी नोंदणी सुरू असून १८६ अर्ज प्राप्त झाले आहेत.

**-जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग**




# फेसबुक, इन्स्टाग्रामसाठी आता पैसे मोजावे लागणार

जर तुम्ही फेसबुक आणि इन्स्टाग्राम युजर असाल तर तुमच्यासाठी महत्वाची बातमी आहे. मेटाने दोन मोठ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे. फेसबुक आणि इन्स्टाग्राम वापरणाऱ्यांना आता पैसे खर्च करावे लागणार आहेत.

मेटाने हा निर्णय सध्यतरी युरोपपुरता घेतल्याचे वृत्त आहे. युरोपियन युनियनद्वारे जाहिराती आणि खासगीपणा यावर सातत्याने दबाव टाकला जात आहे. यामुळे मेटाने हा निर्णय घेतल्याचे वृत्तात सांगण्यात आले आहे. असाच दबाव भारतातूनदेखील घातला जात आहे. यामुळे येत्या काळात भारतातदेखील मेटा फेसबुक आणि इन्स्टासाठी पैसे आकारण्याची शक्यता आहे.

युरोपियन युनियन देशांच्या वापरकर्त्यांसाठी फेसबुक आणि इंस्टाग्रामच्या दोन सेवा असतील, त्यापैकी एक सशुल्क असेल आणि दुसरी विनामूल्य असेल. जे युजर फेसबुक आणि इंस्टाग्रामची सशुल्क सेवा घेतील त्यांना फेसबुक आणि इंस्टाग्रामवर जाहिराती दाखवल्या जाणार नाहीत. परंतू, जे युजर फ्रीमध्ये सेवा वापरतील त्यांना जाहिराती दाखविल्या जाणार आहेत.

मेटाने अद्याप आपल्या निर्णयावर कोणतेही अधिकृत विधान जारी केलेले नाही. पेड व्हर्जनसाठी युजर्सकडून किती पैसे घेतले जातील हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. इन्स्टाग्राम आणि फेसबुक दोन्ही एकाच सबस्क्रीप्शनमध्ये वापरता येतील की वेगवेगळे हे देखील समजलेले नाहीय. मेटा २०१९ पासून युरोपियन युनियनच्या चौकशीला सामोरे जात आहे. कंपनीवर अनेक दिवसांपासून वापरकर्त्यांचा डेटा त्यांच्या परवानगीशिवाय गोळा केल्याचा आरोप होत आहे.

# शास्त्रीय गायिका डॉ. प्रभा अत्रे

प्रभा दत्तात्रेय अत्रे यांचा जन्म पुण्यात १३ सप्टेंबर १९३२ रोजी झाला. त्यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षणही पुण्यातच झाले. त्यांचे वडील दत्तात्रेय पिलाजी अत्रे पुण्याच्या रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलमध्ये हेडमास्तर होते. आई इंदिरा अत्रे त्याच शाळेमध्ये शिक्षिका होत्या. घरात गाण्याची परंपरा नव्हती; पण आईच्या आजारपणाचे निमित्त झाले व विरंगुळ्यासाठी हार्मोनिअम घरात आणण्यात आली. त्यांचे प्रारंभीचे शिक्षण विजय करंदीकर यांच्याकडे झाले आणि त्यानंतर त्यांनी किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक सुरेशबाबू माने यांच्याकडे शिक्षण घेतले.

प्रभा अत्रेंना १९४८ ते १९५३ पर्यंत सुरेशबाबूंकडून किराणा घराण्याची पद्धतशीर तालीम मिळाली. त्यांना सुरेशबाबूंच्या आकस्मिक निधनानंतर १९५५ ते १९५७ पर्यंत त्यांच्या भगिनी व ज्येष्ठ गायिका हिराबाई बडोदेकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांना १९५५ साली केंद्र सरकारने शास्त्रीय संगीतासाठी जाहीर केलेली शिष्यवृत्ती मिळाली. पुढे १९५७ नंतरची त्यांची वाटचाल स्वचिंतनातून झाली. अमीर खाँ आणि बडे गुलाम अली खाँ यांच्या गायकीने त्यांना एक वेगळी नवी वाट दाखविली.

प्रभा अत्रे यांनी गांधर्व महाविद्यालयाच्या ' संगीत अलंकार' आणि 'संगीत प्रवीण' या पदव्या प्राप्त केल्या आहेत तसेच ट्रीनीटी कॉलेज ऑफ लंडन येथून त्यांनी वेस्टर्न



## निमित्त

म्युझिक थिअरी या विषयातही अभ्यास पूर्ण केला आहे. त्यांनी पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयामधून बी.एस्सी., कायदा महाविद्यालयामधून एलएल.बी. आणि बार काउन्सिल अशा पदव्या मिळविल्या. शिक्षण चालू असताना प्रभा अत्रेंनी मैफलींबरोबरच काही काळ संगीत नाटकांमधूनही मुख्य भूमिका केल्या. 'संगीत शारदा', 'विद्याहरण', 'संशयकल्लोळ', 'मृच्छकटिक' इ. नाटकांमधून त्यांना नावाजलेल्या नटांबरोबर काम करण्याची संधी मिळाली. पण तिथे त्यांचे मन फार काळ रमले नाही. त्यांना संगीतच भावले होते आणि मुख्य म्हणजे आकाशवाणीत अचानक नोकरी मिळाल्यामुळे त्यांनी संगीतात करिअर करायचे ठरवले. आकाशवाणीत साहाय्यक संगीत निर्माता म्हणून त्यांनी १९६० ते १९७० पर्यंत काम केले आहे. त्यानंतर त्यांनी १९७९ ते १९९२ पर्यंत मुंबईच्या श्री.ना.दा.ठा. महिला विद्यापीठात संगीत विभाग प्रमुख म्हणूनही काम केले.

प्रभा अत्रेंचे गाणे शांत, गंभीर, भावनेने ओथंबलेले व अतिशय बुद्धीप्रधान आहे. मींड आणि स्वरकणांचा विपुल प्रयोग, भावपूर्ण स्वर लगाव, शब्दांचे स्पष्ट सांगीतिक उच्चार, आलाप, ताना, सरगम मधील लालित्य, वैविध्य आणि नाविन्य सामान्य श्रोत्यालाही जाणवावे. कर्नाटक संगीतातील गमक आणि सरगम या माध्यमांतून हिंदुस्थानी संगीताला अधिक समृद्ध करण्यात प्रभा अत्रे यांचे मोठे योगदान आहे.

प्रभा अत्रेंच्या ठुमरीनेही आपले वेगळेपण प्रस्थापित केले आहे. देशातील एक ज्येष्ठ गायिका, रचनाकार, चिंतनकार, लेखिका आणि गुरू अशा विविध भूमिकांमधून प्रभा अत्रेंचे कार्य जनतेसमोर आले आहे. भारत सरकारने त्यांना १९९० साली 'पद्मश्री' व '२००२ साली पद्मभूषण' पुरस्कार देऊन त्यांच्या संगीत विषयक कर्तृत्वाचा गौरव केला आहे. तसेच, मध्य प्रदेश शासनाचा 'कालिदास सन्मान', १९९१ साली 'संगीत नाटक अकादमी पुरस्कार', असे इतर राष्ट्रीय पुरस्कारही त्यांना प्राप्त झाले आहेत.संकेश्वर येथील शंकराचार्य यांच्याकडून त्यांना गान प्रभा असा सन्मान मिळाला आहे. पुण्यातील सुप्रसिद्ध अशा सवाई गंधर्व -भीमसेन संगीत महोत्सवाची' सांगता करण्याचा मान ज्येष्ठ गायिका म्हणून प्रभा अत्रे यांना मिळाला आहे.

**-डॉ. अश्विनी वळसंगकर/डॉ. आर्या जोशी (साभार : महाराष्ट्रनायक)**


## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : पावसाच्या अधूनमधून सरी येत असल्याने थोड्याफार प्रमाणात का होईना पण जलस्त्रोत भरलेले दिसत आहेत.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# गोड खायची लालसा अशी करा कंट्रोल!



आपल्याला मध्येच काहीही खायची इच्छा होते. यात गोड खाण्याची लालसाच अधिक असते. ही लालसा कशी थांबवायची? आयुर्वेदात काही पदार्थ सांगितले गेलेत जे आपल्याला आपली लालसा कंट्रोल करण्यासाठी मदत करू शकतात. कोणते पदार्थ आहेत हे? जाणून घेऊया...

**मेथीदाणे:** मेथीच्या दाण्याला आयुर्वेदात फार महत्त्व आहे. हे दाणे रक्तातील साखरेची पातळी स्थिर करतात. मेथीचे दाणे रात्रभर भिजवून ठेवा आणि सकाळी खा. सारखं गोड खायची इच्छा होत असेल तर मेथीच्या दाण्यांचे सेवन करा.

**कारले:** आयुर्वेदात असं सांगितलं गेलंय की जर तुम्हाला गोड पदार्थ खाण्याची इच्छा होत असेल तर कडू पदार्थ तुम्हाला ही लालसा कमी करण्यात मदत करू शकतात. यात सगळ्यात वर येते कारले. कारले हा एक चांगला उपाय आहे. कारलं खाल्ल्याने गोड खायची इच्छा होत नाही. याने कफदोष सुद्धा दूर होतो. कारल्याचा ज्यूस तुम्ही रोज पिऊ शकता.

**त्रिफळा:** आवळा, बिभीतकी आणि हरितकी मिळून त्रिफळा तयार होते. त्रिफळा चूर्ण पचन सुलभ करते. त्रिफळा मुळे वजन मेंटेन राहते आणि शरीर सुद्धा डिटॉक्सिफाई करते. झोपण्याआधी जर त्रिफळा चूर्ण कोमट पाण्यासोबत घेतलं की त्याचा फायदा होतो.

**अश्वगंधा:** ताणतणाव असेल तर आपल्याला गोड खायची इच्छा होते. यासाठी आपण ताणतणाव कमी करायचा प्रयत्न करायला हवा. आयुर्वेदात अश्वगंधा हे ताणतणाव दूर करण्यासाठी बेस्ट आहे असं सांगितलं गेलंय. अश्वगंधा तुम्ही दुधात टाकून पिऊ शकता शिवाय त्याचा चहा सुद्धा बनवला जाऊ शकतो.

**बडीशेप:** आपण नेहमी ऐकतो जेवणानंतर बडीशेप खावी. पण याची कारणे काय असतात? बडीशेप पचनास मदत करते. जेवणानंतर बडीशेप खाल्ली की त्यानंतर काहीच खायची लालसा होत नाही. जर तुम्हाला जेवल्या नंतर सुद्धा भूक लागत असेल तर तुम्ही हा उपाय करू शकता.

# मुंबई-गोवा महामार्गावर सुविधा केंद्राचे मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन




**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकणात जाणारे गणेशभक्त तसेच चाकरमान्यांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने मुंबई-गोवा महामार्गावर विविध ठिकाणी सुविधा केंद्र सुरू करण्यात आलेली आहेत. यापैकी खारपाडा येथील सुविधा केंद्राचे उद्घाटन सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते मंगळवारी (दि. १२) झाले.

या सुविधा केंद्रांवर प्रथमोपचार केंद्र, शौचालय व्यवस्था तसेच चहाचा स्टॉल या सुविधा सुरू करण्यात आल्या आहेत. गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या भाविकांचा प्रवास हा लांबचा असल्याने त्यांच्या वाहनचालकांना चहाची सुविधा मिळावी, त्याचप्रमाणे प्रवाशांना शौचालयाची व्यवस्था व्हावी या दृष्टीने ही सुविधा केंद्र सुरू करण्यात आल्याची माहिती मंत्री चव्हाण यांनी या वेळी दिली. मुंबई-गोवा महामार्गावर खारपाड्यापासून दर १५ किमीवर अशा प्रकारची सुविधा केंद्र सुरू करण्यात आली आहेत, असेही त्यांनी सांगितले.

मंत्रीमहोदयांच्या समवेत भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहेरे, दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, कर्जत विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे, युवा नेते हॅप्पी सिंग आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# कर्जत तहसीलमधील अव्वल कारकून लाच घेताना जेरबंद

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तहसील कार्यालयातील अव्वल कारकून रवी दशरथ सोनकांबळे यांना सोमवारी (दि. ११) दहा हजारांची लाच घेताना पकडले गेले आहे.



तालुक्यातील बिल्डर आपल्या जागेत महारेरानुसार काम करीत असताना त्यांच्याविरुद्ध आलेल्या तक्रारीवरून जप्तीची कारवाई करण्यात यावी, यासाठी ग्राहक प्रयत्नशील होते. महारेरानुसार बांधकाम न केल्याने त्या बिल्डरवर १३,९१,१३५ रु. एवढ्या रकमेचे जप्ती वॉरंट प्राप्त केले होते. जप्ती वॉरंटप्रकरणी तक्रारदारांना दिलासा देण्यात यावा यासाठी सोनकांबळे यांनी तक्रारदारांकडून २० हजार रुपये स्वीकारले होते. तरीदेखील तक्रारदारांकडून सोनकांबळे हे दहा हजारांची लाच मागत होते. त्यामुळे संबंधित बिल्डरनेलाच लाचलुचपत विभागाकडे तक्रार केली होती.

विभागाने खात्री केल्यानंतर सोमवारी कर्जत तहसील कार्यालात सापळा रचला. अव्वल कारकून रवी सोनकांबळे यांना तहसील कार्यालयात दहा हजार रोख स्वीकारताना रंगेहाथ पकडले. लाचलुचपत विभागाने उपअधीक्षक शशिकांत पाडावे यांनी ही कारवाई केली. या वेळी सहाय्यक फौजदार अरुण करकरे, विनोद जाधव, शरद नाईक आणि हवालदार महेश पाटील यांनी ही कारवाई केली. या पथकाने सोनकांबळे यांच्या खोपोली येथील घरीदेखील छापा टाकला आहे.

# उंबरवाडी जंगलात महिलेचा मृतदेह

**पाली** : सुधागड तालुक्यातील उंबरवाडी गावाच्या बाजूला असलेल्या जंगल भागात एका अनोळखी महिलेचा मृतदेह आढळला. मृतदेह सडलेल्या स्थितीत असल्याने महिलेची ओळख अद्याप पटलेली नाही. या घटनेची पाली पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत डॉगस्क्वॉड आणि फॉरेन्सिक लॅबच्या टीमसह प्रत्यक्ष येऊन पाहणी केली. पुढील तपास पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

## पब्लिक नोटीस

हि पब्लिक नोटीस माझे अशील यांचे वतीने जनतेस आवाहन म्हणून देण्यात येत आहे. माझे अशिलांनी खालील नमूद केलेली मिळकत खरेदी करायची ठरविली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे/गांव | घर/मिळकत | ग्रामपंचायत | सेक्टर |
|---|---|---|---|
| पेठपाडा, ओवे खारघर - ४१०२१० | १९६ (जुने घर क्रमांक ११२५ क) | ओवे, खारघर | ३३-अ |

**क्षेत्रफळ: ५० X ९३ स्के, फु. = ४६५० स्के, फु. (पनवेल महानगर पालिका नोंदणीनुसार जागेचे खरे क्षेत्रफळ ६५ X ९३ स्के, फु.)**

तसेच, ग्रामपंचायत -ओवे, खारघर व पनवेल महानगर पालिकेच्या नोंदणीनुसार, सद्य स्थितीला घर / मिळकतीचे मालक म्हणून श्रीमती संगीता प्रभाकर वास्कर रा. घर क्रमांक १४४७, सेक्टर- ३२, ओवे, खारघर - ४१०२१०, ता पनवेल, जिल्हा रायगड, महाराष्ट्र हे एकमेव मालक आहे.

तरी जनतेस आवाहन आहे कि, जर कोणास मिळकत संबंधी कायदेशीर दावा, हक्क, अधिकार किंवा कोणत्याही प्रकारचे संबंध प्रस्थापित असल्यास खालील पत्तावर ३० दिवसाचे आत, लिखित स्वरूपात व कागदोपत्री संपर्क साधावा अन्यथा माझे अशिलांचे वरील नमूद घर/ मिळकतीवर रजिस्टर खरेदीपत्राद्वारे मालकी हक्क प्रस्थापित झाल्यास अन्य कोणाचेही अधिकार, हक्क, वाटा, दावा ग्राह्य धरले जाणार नाही.

**दिनांक :-**
**१२/०९/२०२३**

**सही/-**
**ॲड. सतीश निखार, ऑफिस-**
**शॉप नं. १, ज्ञान मुक्ताई, प्लॉट नं. १९,**
**सेक्टर १३, खारघर - ४१०२१०**
**मो :- ७५०६७५७४३१/८८०५६२८८२४**

## नावात बदल

माझे जुने नाव **गिरी मधुकुमारी विजय,** राहणार शिवनगर कातकरवाडी , पो. मोहोपाडा, चांभार्ली, ता. खालापूर जि. रायगड महाराष्ट्र हे माझे नाव १० वीच्या प्रमाणपत्रावर चुकीने लागले आहे माझे खरे व बरोबरचे नाव मधु विजय गिरी असून गिरी मधुकुमारी विजय ह्या दोन्ही एकच व्यक्ती आहे. याबाबत मी ॲफीडेविट क्र. २३५२०४१७५१२६८६००१२६९९४ दिनांक १२/०९/२०२३ रोजी बदलले असून यापुढे मी मधु विजय गिरी या नवीन नावाने ओळखली जाईल.

**सही/-**
**(नवीन नावाने)**
**मधु विजय गिरी**

# शाश्वत विकास साधण्यासाठी नऊ संकल्पना रूजवा -शैलेंद्र तांडेल



**चौक** : गावचा सर्वांगीण शाश्वत विकास साधण्यासाठी नऊ संकल्पना राबवताना त्यातील अत्यावशक संकल्पनेवर विशेष लक्ष द्या, म्हणजे विकास केल्याची शाश्वत खात्री पटेल, असे आवाहन वरीष्ठ विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल यांनी केले.

राष्ट्रीय ग्राम स्वराज्य या माध्यमातून आपल्या गावचा विकास आराखडा सन २०२४-२५ करण्यासाठी ग्रुप ग्रामपंचायत वडवळ येथे आयोजित ग्रामपंचायत आराखडा तयार करण्यासाठी सभा घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

गावाशी संपर्क साधून गरिबीमुक्त, आरोग्यदायी, बालस्नेही, जलसमृद्ध, स्वच्छ आणि हरित गाव, पायाभूत सुविधायुक्त गाव, सामाजिक न्याय आणि सामाजिकदृष्ट्या सुरक्षित गाव, सुशासनयुक्त गाव व महिलास्नेही गाव या नऊ संकल्पना गावाच्या विकासासाठी महत्त्वाच्या आहेत. ग्रामस्थांची उपस्थिती मोठी असल्याने आराखडा करण्यासाठी अडचण नसून हा ग्रामसहभाग गावच्या विकासासाठी महत्त्वाचा आहे, असे त्यांनी सांगितले. वडवळ सरपंच ज्ञानेश्वर सुतार, आदर्श शिक्षक सुधाकर थळे, आजी-माजी सरपंच, सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

# सर्वांच्या सहकार्याने पतसंस्थेची भरभराट -आनंदशेठ यादव

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोल पतसंस्थेच्या भागधारकांची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन आनंदशेठ यादव यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी (दि.१०) झाली. सर्वांच्याच सहकार्याने संस्थेची भरभराटी झाली असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.



व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून सर्वानुमते मंजूर करण्यात आले. सभेसाठी सभासद मनोज मिरजकर, रमेश मिरजकर, ज्येष्ठ संचालक दिलीप जाधव, दिलीप जाधव, उदय म्हशेलकर, दिलीप अंबुर्ले, संदीप खरंगटे, अरुण प्रभाळे, माजी नगरसेवक जयंत बोडेरे, अलीभाई यतिनमनी, सभासद नामदेव लाड, रमेश मिरजकर, शांताराम मेकडे, मनोज मिरजकर, बळीराम मोरे, शेखर जाधव आदींसह भागधारक उपस्थित होते.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ५९/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | तळोजा औद्योगिक क्षेत्र.. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील केमिकल, न्यू केमिकल झोन व एल, एम, व्ही आणि टी ब्लॉकमध्ये आरसीसी बिल्टअप गटर्ससह सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते बांधणे. | ₹ २०१,१९,८१,३०७.०० |
| २. | विळे भागड औद्योगिक क्षेत्र.. विळेभागड औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेच्या जलशुद्धीकरण केंद्रामधून रायगड जिल्हा, माणगाव तालुक्यातील कडपे, कडपेवाडी, कांदळगाव, बांदलवाडी, निजामपूर, कोष्टे (ख) गावांना पाणीपुरवठा करण्याकरीता मृदू पोलादी जलवाहिनीचा पुरवठा करणे. | ₹ १४,३८,५०,३३३.०० |

उपरोक्त अ.क्र. १ वरील कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक १३/०९/२०२३ ते दिनांक २७/१०/२०२३ पर्यंत व अ.क्र. २ वरील कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक १३/०९/२०२३ ते दिनांक ०९/१०/२०२३ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी अ.क्र. १ वरील कामाबाबत दिनांक २५/०९/२०२३ पूर्वी व अ.क्र. २ वरील कामाबाबत दिनांक २०/०९/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा अ.क्र. १ वरील कामाकरीता दिनांक ०३/१०/२०२३ पासून व अ.क्र. २ वरील कामाकरीता दिनांक २६/०९/२०२३ पासून संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## MAHAVITARAN — E-TENDER NOTICE

Tender is invited from reputed & registered contractors for following works.

| Sn | E-Tender No. | Particulars of tender | Amt. of tender / EMD/tender fee | Purchase tender |
|---|---|---|---|---|
| 1 | EE/PNL-U/Tech /Tender- 07 / 2023-2024 | Contract for Renovation of Electrification work of Panvel Urban Division Office under (O&M) Division, Panvel Urban . | Rs. 9.00 lakhs Rs.9,000 Rs.1180/- | Dt.12.09.23 to19.09.23 upto 17.00 hrs. |

PRO- 295/2023 Dt. 08.09.2023

**Executive Engineer(O&M)**
**Panvel(U).**

## छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे

**(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)**

**बालचित्रवाणी इमारत, गोपाळ गणेश आगरकर रोड, सेनापती बापट रोडच्या मागे. पुणे (महाराष्ट्र) ४११००४**

Email ID sarthipune@gmail.com CIN- U74999PN2018NPL 177394 Website: www.sarthi maharashtragov.in ०२०-२५५९२५०२

ई-मेल :skillsarthipune@gmail.com (CIN-U74999PN2018NPL177394)
संकेतस्थळ : www.sarthi maharashtragov.in दूरध्वनी क्र. ०२०-२५५९२५०२

### सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम

'सारथी' संस्थेमार्फत आयोजित कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा- कुणबी या सारथीच्या लक्षित गटाच्या १८ ते ४५ या वयोगटातील महाराष्ट्रातील २०००० उमेदवाराकरिता सारथी संस्थेमार्फत **निःशुल्क** कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. लक्षित गटातील पात्र व इच्छुक उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर प्रशिक्षणासाठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी संकेतस्थळ खुले करण्यात आले असून अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज भरावा. तसेच, उमेदवारामार्फत कौशल्य प्रशिक्षण व अभ्यासक्रम मागणी नोंदविण्याकरिता लिंक पुढीलप्रमाणे- https://kaushalya.mahaswayam.gov.in/users/sarthi

सदर प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS), मुंबई यांचे अंतर्गत असणारे सर्व कोर्सेस राबविण्यात येत असून स्किल इंडिया पोर्टल वर सूचीबद्ध असलेल्या ५ स्टार, ४ स्टार व ३- स्टार रेटिंग असलेल्या प्रशिक्षण संस्थाद्वारे प्रशिक्षण देणे प्रस्तावित आहे. कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र निवडीसाठी / अपेक्षित कोर्ससाठी आपल्या जवळील जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

अर्ज भरण्यासाठी सारथी संकेतस्थळ: http://sarthi maharashtragov.in>Notice Board>Skill Development Online Application Form तसेच, सारथी कौशल्य विकास कार्यक्रमाविषयी भविष्यात कोणतीही माहिती/सूचना उपरोक्त लिंक वरच दिली जाईल. वृत्तपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. उमेदवारांनी सारथीच्या उपरोक्त संकेतस्थळावर सूचनाफलक पहावे.

**श्री. अशोक काकडे (भा.प्र.से.)**
**व्यवस्थापकीय संचालक सारथी, पुणे.**

## पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड, पनवेल ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

### ई-निविदा सुचना

पनवेल महानगरपालिकेतील सी सी टी व्ही यंत्रणेचे दर, देखभाल व दुरुस्ती मनुष्यबळासहित तसेच भाडेतत्तावरचे (प्रती दिवस) या बाबतचे दर मंजूर करणेबाबत बाजारभाव मागविणे आवश्यक आहे. तरी, सदर कामीचे दर मागविणेस मंजूरीस्तव सादर. संबंधित निविदा धारक यांनी त्याची नोंद घ्यावी.

**पमपा/मातंवि/२३२३/प्र.क्र.३/१४२/२०२३**
**दिनांक : १२/०९/२०२३**

**सही/-**
**(कैलास गावडे)**
**उप आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

### ऑनलाईन निविदा सूचना क्रमांक ६१ सन २०२३-२०२४

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५ - २२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को या निविदा नमुना **दिनांक १३/०९/२०२३ रोजी सकाळी १०.०० पासून दिनांक २०/०९/२०१३ रोजी १८.०० वाजे** पर्यंत www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरून ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील व **दिनांक २१/०९/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरून पाठविलेल्या निविदा शक्यतो **दिनांक २१/०९/२०२३ रोजी ११.०० वाजता** उपडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | म्हसळा कोंझरी रस्ता प्र.जि.मा. ७३ कि.मी. १०/६५० मधील मोऱ्यांची दुरूस्ती व संरक्षक भिंत बांधकाम करणे तालुका म्हसळा, जिल्हा रायगड (पुरहानी दुरूस्ती) | ९८६८३० | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| २. | म्हसळा कोंझरी रस्ता प्र.जि.मा. ७३ कि.मी. १०/७५० मधील मोऱ्यांची दुरुस्ती व संरक्षक भिंतचे बांधकाम करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड (पुरहानी दुरुस्ती) | ९९१३८५ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ३. | म्हसळा कोंझरी रस्ता प्र.जि.मा. ७३ कि.मी. १०/८०० मधील मोऱ्यांची दुरुस्ती व संरक्षक भिंतचे बांधकाम करणे. तालुका म्हसळा जिल्हा रायगड (पुररहानी दुरूस्ती) | ९१९४२६ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ४. | म्हसळा कोंझरी रस्ता प्र.जि.मा. ७३ कि.मी. ६/८५० मधील मोऱ्यांची दुरुस्ती व संरक्षक भिंतचे बांधकाम करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड (पुरहानी दुरूस्ती) | ९९५३७७ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ५. | म्हसळा कोंझरी रस्ता प्र.जि.मा. ७३ कि.मी. ६/७०० नील मोऱ्यांची दुरुस्ती व संरक्षक भिंत बांधकाम करणे, तालुका म्हसळा,जिल्हा रायगड (पुरहानी दुरूस्ती) | ९४४९३६ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | म्हसळा कोंझरी रस्ता प्र.जि.मा. ७३ कि.मी. ५/७०० मधील मोऱ्यांची दुरुस्ती व संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. तालुका म्हसळा जिल्हा रायगड (पुरहानी दुरूस्ती) | ९८२६८९ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | बागमांडला आंबेत टोळ वीर रस्ता रा.मा. १०० कि.मी. १६/०० मधील मोऱ्यांची दुरूस्ती व संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | ९८६७४४ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | म्हसळा कोंझरी रस्ता प्र.जि.मा. ७३ कि.मी. १९/१०० मधील मोऱ्यांची दुरुस्ती संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. तालुका म्हसळा जिल्हा रायगड (पुरहानी दुरुस्ती) | ८१७९३५ | ९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ९ | बागमांडला आंबेत टोळ वीर रस्ता रा.मा. १०० कि.मी. १५/४०० मधील मोऱ्यांची दुरुस्ती व संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड | ९८६७५४ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | धामणी येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड | ८४३२२४ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |

टिप १) रापशिलवार निविदा सूचना https/mahapwd.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किवा विकता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/**
**दिनांक : ११/०९/२०२३**

**विमाका/कोवि/२०२३-२०२४/१५७**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# नवी मुंबईत १३९ कृत्रिम तलावांची निर्मिती

## गणेशोत्सवात जलप्रदूषण टाळण्याचे पालिका आयुक्तांचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

पर्यावरणपूरकतेची कास नवी मुंबई महापालिकेने नेहमीच धरलेली असून मोठ्या प्रमाणावर साजरा होणारा श्रीगणेशोत्सव पर्यावरणाची जपणूक करून इकोफ्रेंडली स्वरूपात साजरा करण्याचे आवाहन नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने नवी मुंबईकर नागरिकांना यापूर्वीच करण्यात आले असून त्याला नागरिकांचा व गणेशोत्सव मंडळांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. यंदा पालिकेने १३९ कृत्रिम तलावांची निर्मिती करण्याचे ठरवले असून त्याचे काम सुरू आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानुसार, महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी श्रीगणेशोत्सवामध्ये मंडप उभारणीकरिता कोणत्याही प्रकारचे शुल्क न




आकारण्याचा निर्णय जाहीर केला असून त्याचे सर्व गणेशोत्सव मंडळांनी स्वागत केले आहे. नवी मुंबई महापालिकेने गणेशोत्सवामध्ये मंडप उभारण्याकरिता परवानगी मिळण्यासाठी मंडळांना अर्ज करण्यास १८ ऑगस्टपासून ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यासाठी प्रत्येक विभाग कार्यालयात विशेष कक्ष स्थापित करण्यात आला असून मंडळांना विहित कालावधीत परवानगी मिळावी याची खबरदारी घेतली जात आहे.

तलावातील जलप्रदूषण रोखण्यासाठी १४ मुख्य तलावातील जलाशयाच्या साधारणत: ३० टक्के भागात नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत गॅबियन वॉल उभारण्यात आल्या असून या विशिष्ट क्षेत्रात नागरिकांनी श्रीमूर्ती विसर्जन करावे आणि जलप्रदूषण रोखावे या आवाहनासही सुरुवातीपासूनच चांगला प्रतिसाद मिळत आहे. या संकल्पनेचे राष्ट्रीय पातळीवर कौतुक करण्यात आलेले आहे. कृत्रिम तलावांना नागरिकांचा मिळणारा चांगला प्रतिसाद पाहता नागरिकांच्या सूचनेनुसार आवश्यकता लक्षात घेऊन कृत्रिम तलाव संख्येत प्रतिवर्षी वाढही करण्यात आलेली आहे. याही वर्षी मागील वर्षीच्या संख्येत पाचने वाढ करून एकूण १३९ कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात आलेली आहे.

पर्यावरणप्रेमी नवी मुंबईकर नागरिकांनी श्रीमूर्ती शाडूची व पर्यावरणपूरक असेल याची काळजी घ्यावी त्याचप्रमाणे श्रीमूर्तीचे विसर्जन शक्यतो घरच्या घरी करावे अथवा नजीकच्या कृत्रिम विसर्जनस्थळी करावे, तसेच पीओपीची मूर्ती असल्यास त्यांचे विसर्जन कृत्रिम तलावातच करावे आणि पर्यावरणशील इकोफ्रेन्डली गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### पर्यावरण रक्षणासाठी सकारात्मक पाऊल

*कृत्रिम तलावांमुळे नैसर्गिक जलस्तोतांतील जलप्रदूषणाला प्रतिबंध होऊन त्यांचे प्रदूषण कमी होत असते. नवी मुंबई हे स्वच्छ शहराप्रमाणेच पर्यावरणशील शहर म्हणून नावाजले जात असून या इतक्या मोठ्या संख्येने असलेल्या कृत्रिम तलावामुळे पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने एक सकारात्मक यशस्वी पाऊल उचलले जात आहे. या संकल्पनेला उत्स्फूर्त प्रतिसाद देणाऱ्या नवी मुंबईकर नागरिकांचा याकामी महत्त्वाचा वाटा आहे.*

## अतिरिक्त भाडे आकारणाऱ्या १२ बसेसवर कारवाई



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवाकरिता कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची लगबग सुरू झाली असून मात्र याचा गैरफायदा घेत खासगी बसचालक या प्रवाशांकडून काही अव्वाच्या सव्वा दर आकारून प्रवशांची लुटमार करीत असतात. मागील तीन दिवसांपासून आरटीओने महामार्गावर खासगी बसची तपासणी सुरू केली असून २७ बसेसपैकी १२ बसधारक निश्चित केलेल्या दरापेक्षा अतिरिक्त भाडे आकारणी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आरटीओकडून या १२ बसेसवर दंडात्मक कारवाई करून ४१ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

ऐन सणासुदीला हे खासगी बसधारक अव्वाच्या सव्वा दर आकारून प्रवाशांची लूट करतात, मात्र अशा या लूटमारीला आता आळा घालण्यासाठी वाशी उपप्रादेशिक कार्यालयाची या बसेसवर करडी नजर ठेवण्यात आली आहे. त्यासाठी पथके तयार केली असून अशा बसेसची तपासणी केली जात आहे.

तीन दिवसांपासून अशा खासगी बसेसची तपासणी करण्यात आली असून यात आतापर्यंत १२ बसमालक दोषी आढळले असून त्यांच्यावर कारवाई करून ४१ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती वाशी उपप्रादेशिक अधिकारी हेमांगिनी पाटील यांनी दिली आहे.

## ॲड. सुरेखा भुजबळ यांना पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील ख्यातनाम गायिका ॲड. सुरेखा भुजबळ यांना यावर्षीच्या कलाकुंज शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ॲड. सुरेखा भुजबळ यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या विशेष उल्लेखनीय कार्याच्या गौरवार्थ कालिदास कलामंदिर नाशिक येथे यंदाच्या कलाकुंज शिक्षकरत्न पुरस्काराने भुजबळ यांना गौरविले.



पनवेलमधील संगीत विशारद सुरेखा भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली गेली ९ वर्षे नवीन पनवेल येथे शास्त्रीय-उपशास्त्रीय व सुगम संगीताचे तसेच तबला, पेटी व गिटार वादनाचे क्लासेस घेतले जातात. सुरेखा भुजबळ गेली २१ वर्षे संगीत क्षेत्रात कार्यरत आहेत. मेलडी मेकर्ससह विविध नामांकित वाद्यवृंदांच्या माध्यमातून तसेच सिनेसृष्टीतील सुप्रसिद्ध पार्श्वगायकांसमवेत त्यांनी देशभरात गायनाचे कार्यक्रम केले आहेत. ॲड. सुरेखा भुजबळ यांच्या यशात त्यांचे पती ॲड. प्रशांत भुजबळ यांचा मोलाचा वाटा आहे.







**पनवेल : हरि ओम सामाजिक मित्र मंडळाच्या पनवेलचा राजा चिंतामणीचे रविवारी ढोल ताशाच्या गजरात आगमन झाले. या वेळी पनवेलमधील साईराज पथकाने वादन करून रंगत आणली.**

## रिटघर विद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने रिटघर येथील श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर १५ व १६ सप्टेंबर रोजी होणार आहे.

सीकेटी महाविद्यालयाच्या या किर्तीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचासुद्धा वाटा आहे. हा विभाग वर्षभर समाजकेंद्री उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करीत असतो. याच धर्तीवर आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या आरोग्य शिबिरात नेत्र तपासणी, मधुमेह तपासणी, अस्थिरोग तपासणी करून बॉडी मास इंडेक्स व तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला देण्यात येणार आहे. १५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४.३० आणि १६ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी १.३० दरम्यान होणाऱ्या या आरोग्य शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## बबन बारगजे भाजप भटके विमुक्त आघाडीच्या सलग तिसऱ्यांदा जिल्हाध्यक्षपदी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप उत्तर रायगड जिल्ह्याच्या भटके विमुक्त आघाडीच्या अध्यक्षपदी बबन बारगजे यांची सलग तिसऱ्यांदा निवड झाली आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी बारगजे यांच्यावर रायगड जिल्हा भटके विमुक्त आघाडीची जिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदारी सोपवली. तीन वर्षांचा कार्यकाळ झाल्यानंतर रायगड जिल्ह्याचे दोन



भाग झाले व पुन्हा उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाली. आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी काम करीत असताना बबन बारगजे यांनी उत्तर रायगड जिल्हा पिंजून काढला व भटके विमुक्त समाजातील वंचितांना न्याय देण्याचे काम केले. त्यामुळे २०२३ला पुन्हा जिल्हा कार्यकारिणी जाहीर झाली व त्यामध्ये आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी पुन्हा तिसऱ्यांदा बबन बारगजे यांची निवड करण्यात आली. त्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आणि भाजप पदाधिकाऱ्यांसह जय गोपीनाथ प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

एक प्रामाणिक कार्यकर्ता व समाजातील तळागाळात फिरणारा कार्यकर्ता म्हणून बबन बारगजे यांची ओळख आहे. सामाजिक कार्यात सदैव पुढे असणारे बबन बारगजे यांचा दांडगा संपर्क आहे. त्यामुळेच त्यांना पुन्हा तिसऱ्यांदा जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोपवली आहे.





**पनवेल : भाजप पनवेल ग्रामीण अध्यक्षपदी अरुणशेठ भगत यांची नियुक्ती झाल्याने पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.**




### श्रावण सरी

या रिमझिम श्रावण धारा
सर सर येती धरणी वरती...।
सुगंध तनमन फुलवून जाती
फुले पाखरे पक्षी आनंदाने गाती...।।
या रिमझिम श्रावण धारा
खळखळ करत नदी तुडूंब वाहती...।
ते मंजुळ गाणे मन प्रसन्न करती
सर्व प्राणी जगताची तहान भागवती...।।
या रिमझिम श्रावण धारा
सृष्टी हिरवा भरजरी शालू पांघरती...।
विविध रंगी फुले बहरूनी उमलती
त्यावर फुलपाखरे आनंदाने बागडती...।।
या रिमझिम श्रावण धारा
ऊन पाऊस झिंमा फुगडी खेळती...।
इंद्रधनुष्य आकाशी तोरण बांधती
व्रत वैकल्ये सण सुहासनी करती
या रिमझिम श्रावण धारा
या रिमझिम श्रावण धारा...।।



-चित्रा मलबारी,
पनवेल

## निवडक

### सुमित्र पतसंस्थेची वार्षिक सभा


**रेवदंडा** : येथील सुमित्र ग्रामीण बिगरशेती सहकारी



पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच पतसंस्थेचे अध्यक्ष कमळाकर साखळे यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या वेळी उपाध्यक्ष खलिल तांडेल, संचालक महेंद्र नाईक, उमेश कोंडे, राजेंद्र वाडकर, अशोक हवालदार, विजय चौलकर, सदानंद घरत, संचालिका प्रतिभा वरसोलकर, कमरजब्बीन मुकादम, सलिम तांडेल, मालती ठाकूर, व मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक नागावकर, व्यवस्थापक क्रांती जाधव, रोखपाल नरेश सुर्वे, अरूण गद्रे आर्दीसह सभासद उपस्थित होते. दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

### निलेश थोरेंना समाजभूषण पुरस्कार

**माणगाव** : येथील भाजपचे युवा नेते व माणगाव तालुका शेतकरी सहकारी खरेदी-विक्री संघाचे सभापती तथा



छावा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष निलेश थोरे यांना कोल्हापूर येथील अविष्कार फाउंडेशनतर्फे समाजभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण रविवारी (दि. १७) महाड येथे होणार आहे. युवा नेते निलेश थोरे यांनी कृषी, शिक्षण, सहकार, समाजकारण, राजकारण, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम अशा सगळ्याच क्षेत्रात अष्टपैलू कामगिरी करणारे निलेश थोरे यांनी आजवर केलेल्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून त्यांना हा पुरस्कार देत असल्याचे निवड समितीने सांगितले. त्यांना पुरस्कार मिळाल्याने अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### अबूभाई जळगावकर उपाध्यक्षपदी

**खालापूर** : खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या उपाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते व खोपोलीतील



बांधकाम व्यावसायिक अबूभाई जळगावकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांचे अभिनंदन विविध क्षेत्रातील मान्यवरांनी केले. मंडळाचे किशोर पाटील, संतोष जंगम, दलीत नेते नरेंद्र गायकवाड, कैलास गायकवाड, रवी रोकडे, एकनाथ पिंगळे, माजी नगरसेवक किशोर पानसरे, आझिम जळगावकर व विविध मान्यवरांनी जळगावकर यांचे अभिनंदन केले.

# गणेशोत्सवापूर्वी मध्य रेल्वेकडून प्रवाशांना दिलासा

## गणपती विशेष गाड्यांचे डब्बे वाढवण्याचा निर्णय

**रोहे** : **प्रतिनिधी**

मध्य रेल्वेकडून प्रवाशांना दिलासा दिला असून गणेशोत्सवानिमित्त सोडण्यात येणाऱ्या विशेष गाड्यांमध्ये डबे वाढवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. गणपती विशेष सहा गाड्यांमध्ये एकूण १६ डबे वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



यामध्ये प्रामुख्याने गाडी क्रमांक ०११६५ एलटीटी मंगळुरु एक्सप्रेस प्रथम एकूण २० आयसीएफ कोच रॅक होते. आता सुधारित एकूण २२ आयसीएफ कोच रॅक दोन स्लीपर कोच वाढवले आहे. गाडी क्रमांक ०११६६ मंगळुरू एलटीटी एक्सप्रेस प्रथम एकूण २० आयसीएफ कोच रॅक होते. सुधारित एकूण २२ आयसीएफ कोच रॅक दोन स्लीपर कोच वाढवले आहे. गाडी क्रमांक ०११६७ एलटीटी कुडाळ एक्सप्रेस प्रथम एकूण २० आयसीएफ कोच रॅक होते.

सुधारित एकूण २२ आयसीएफ कोच रॅक दोन स्लीपर कोच वाढवले आहे. गाडी क्रमांक ०११६८ कुडाळ एलटीटी एक्सप्रेस प्रथम एकूण २० आयसीएफ कोच रॅक होते. सुधारित एकूण २२ आयसीएफ कोच रॅक दोन स्लीपर कोच वाढवले आहे. गाडी क्रमांक ०११५५ दिवा चिपळूण एक्सप्रेस प्रथम-मेमू कोचचे एकूण आठ रॅक होते. सुधारित एकूण १२ मेमू कोच रॅक चार सामान्य मेमू डबे वाढवले आहे.

गाडी क्रमांक ०११५६ चिपळूण दिवा एक्सप्रेस प्रथम मेमू कोचचे एकूण आठ रॅक होते. सुधारित एकूण १२ मेमू कोच रॅक चार सामान्य मेमू कोच वाढवण्यात आले आहे.

# कर्जत स्टेट बँकेच्या शाखा व्यवस्थापकावर गुन्हा दाखल

**बनावट कागदपत्र स्वीकारून दीड कोटींचे कर्जवाटप**

**नेरळ** : **प्रतिनिधी**

येथील स्टेट बँकेच्या १६ ग्राहकांचे बनावट कागदपत्रे स्विकारून दीड कोटीचे कर्ज वाटप केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. या प्रकरणी बँकेच्या व्यवस्थापक शैशव नरेंद्र नलावडे यांच्याविरोधात कर्जत पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

कर्जत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेत मुलुंड मिठाघर येथील शैशव नलावडे हे शाखा व्यवस्थपक म्हणून काम करीत होते. १ जून ते ३१ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत नलावडे यांनी १६ ग्राहकांना वैयक्तिक कर्ज मंजूर करून कायदेशीर प्रक्रियाचे अवलंब न करता एकूण एक कोटी ४९ लाख २६ हजार ४९६ रुपयांचे कर्ज वाटप केले, तसेच त्यातील काही रक्कम स्वत:च्या फायद्याकरीता वापरून अपहार केला. या ग्राहकांनी एक कोटी रुपये रक्कम बँकेत भरली, मात्र उर्वरित ४९ लाख २६ हजार ४९६ रुपये न भरल्याने त्यांचे खाते एनपीए झाले. त्बँकेकडून चौकशी झाली असता हा प्रकार उघड झाला.

व्यवस्थापक नलावडे व १६ ग्राहकांनी बनावट कागदपत्रे देऊन ४९ लाख २६ हजार ४९६ रक्कम इतकी रक्कम न भरता अपहार करून फसवणूक केली. त्यामुळे या प्रकाराची बँकेने गंभीररीत्या दखल घेत कर्जत पोलीस ठाण्यात नलावडे यांच्याविरोधात तक्रार दाखल केली आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू रसेडे हे करीत आहेत.

## महास्वयम् संकेतस्थळाबाबत तक्रारी निवारणासाठी हेल्पलाईन सुरू

**अलिबाग** : **रामप्रहर वृत्त**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत महास्वयम् (www.mahaswayam.gov.in) या संकेतस्थळाबाबत तक्रारी निवारणासाठी हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे.

संकेतस्थळावर विविध लाभार्थी घटक (स्टेक होल्डर्स) जसे उमेदवार, उद्योजक, नियोक्ते इत्यादी यांना या संकेतस्ळावर नोंदणी करणे, नोंदणीचे अद्ययावती करणे करणे, रिक्तपदे अधिसूचित करणे, रिक्तपदास अनुसरुन प्लाय करणे, राज्यातील युवक व विद्यार्थी यांना करिअरविषयक संधीची माहिती, रोजगार मेळावे व रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम यामध्ये इच्छूकता दर्शवणे, विविध प्रशिक्षण संस्था, स्टार्टअप इत्यादी विविध ऑनलाईन सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहे.

महास्वयम्


या ऑनलाईन सेवा घेतांना लाभार्थी घटकांना येणाऱ्या अडचणी व तक्रारींची निराकरण करण्यासाठी मुख्यमंत्री हेल्पलाईन अंतर्गत १८ ऑगस्टपासून हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. या हेल्पलाईनचा टोल फ्रि क्रमांक (१८००१२०८०४०) असा आहे. या हेल्पलाईनची वेळ सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत अशी आहे.

# महाड-पनवेल एसटी खांब गावानजीक पडली बंद; प्रवाशांना मनस्ताप

**रोहा** : **प्रतिनिधी**

महाड बसस्थानकातून सुटणारी महाड-पनवेल ही एसटी सोमवारी (दि. ११) सकाळी आपल्या निर्धारित वेळेनुसार प्रवासी घेऊन निघाली, मात्र कोलाड सोडून पुढे येताच खांबनजीक महामार्गावरच अचानक बंद पडल्याने प्रवाशांना भर रस्त्यात दुसऱ्या बसच्या प्रतीक्षेत एक तासाहून अधिक काळ ताटकाळत उभे राहावे लागले.

महाड आगारातून नेहमीप्रमाणे पहाटेची महाड-पनवेल एसटी (एमएच ०६ बीडब्बल्यू ८१५४) चालक कपिल शेप्रचंड व वाहक जी. डी. जावीर हे प्रवासी घेऊन पनवेलकडे मार्गस्थ झाले. बस कोलाड सोडून पुढे येताच खांबनजीक अचानक वायर तुटल्याने बंद झाली. यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल झाले.



**खांबनजीक बस अचानक बंद पडली. चालकाने तपासले असता, काही वायर जाळाल्याचे आढळले. त्यामुळे वरिष्ठ अधिकारी यांना माहिती दिली, तर प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून वाहकाने त्यांना जी मिळेल त्या बसमध्ये पाठवण्याचे काम तातडीने केले.**

**-कपिल शेप्रचंड, बसचालक**

## वढाव येथील राधाकृष्ण जन्मोत्सवाची सांगता

**पेण** : **प्रतिनिधी**

पेणमधील वढाव येथे ३१ ऑगस्टपासून सुरू असलेल्या राधाकृष्ण जन्मोत्सवाची सांगता शनिवारी करण्यात आली. उत्सवात हभप गद्रे



महाराज व त्यांच्या पत्नी यांचे कीर्तन व हरिदासी कीर्तने झाली.

प्रभाकर म्हात्रे व गणेश म्हात्रे यांची आरती, भजने, सायंकाळी नवविधा भक्तीवर प्रवचने झाली. त्यानंतर समर्थांचे मनाचे श्लोक, कबीरांचे दोहे झाले, रात्री प्रदक्षिणा व कीर्तने झाली. उत्सवात वढाव, वाशी, सरेभाग, दिव, विठ्ठलवाडी, भाल येथील भाविकांनी ज्ञानेश्वरी वाचन केले, तसेच सुरेश म्हात्रे व राधाकृष्ण मंडळाचे सर्व पंच वडा उदार देणगीदार यांच्या सौजन्याने हरिपाठ झाले. जनसेवा मार्गदर्शन केंद्राचे माजी पोलीस निरीक्षक आणि राष्ट्रपती पदक पुरस्कार विजेते विश्वनाथ पाटील यांनी स्वतः मृदंग वाजवून व त्यांच्याकडे प्रशिक्षण घेत असलेली मुले यांनी देवळात अभंग व सिद्धी म्हात्रे हिने गवळण म्हटली.

वाशी वढाव ग्रामस्थांच्या वतीने रामचंद्र ठाकूर यांनी विश्वनाथ पाटील यांचा सत्कार केला. १० सप्टेंबर रोजी ज्येष्ठ नागरिक संघ वढाव यांच्या वतीने नववी ते बारावी व स्कॉलरशिपमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा माजी तहसीलदार सुभाष म्हात्रे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# कर्जतमधील महिला शेतकऱ्यांना पशुपालक प्रशिक्षण

**कर्जत** : **प्रतिनिधी**

कर्जत पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभाग आणि सधन कुक्कुटपालन विकासगट आणि युनायटेड वे माध्यमातून महिला शेतकरयांना पशुपालक प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. तालुक्यातील ५० महिलांना पशुपालक म्हणून प्रशिक्षण देण्यात आले.



या प्रशिक्षण शिबिरात महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त डॉ. गिरीश बारडकर, कर्जत पंचायत गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे, पशुधन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव, कशेळे दवाखान्याचे पशुधन अधिकारी डॉ. शशिकांत थोरात, पेण तालुका कुक्कुटपालन समानव्यक डॉ. स्मिता जिंतूरकर आदी प्रमुख उपस्थित होते.

पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त डॉ. गिरीश बारडकर यांनी या पशुपालक प्रशिक्षण शिबिराचा मुख्य उद्देश सांगतानाच पशुपालक यांच्या गरजा आणि पशुपालकांची सद्यस्थिती यावर मार्गदर्शन केले. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पशुधन अभियानाबाबत माहिती देत सर्व पशुपालकांना सहभाग नोंदण्याचे आवाहन केले.

पशुधन विकास अधिकारी डॉ. मिलिंद जाधव यांनी पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांची माहिती देत दुधाळ गट, शेळीगट, कुक्कुट पक्षीगृह बांधकाम, एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम, वैरण विकास योजना या शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन केले, तसेच लंपी चर्म रोगाची लागण झाल्यास गायवर्गीय जनावारामधील विषाणूजन्य यांची कशाप्रकारे काळजी घ्यायची याची माहिती दिली.

गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे यांनी, महात्मा गांधी रोजगार हमी योजना, मनरेगा अंतर्गत दुधाळ जनावरांचे गोठे, शेळ्यांचे गोठे बांधकाम योजना आणि इतर योजनांबाबत मार्गदर्शन केले. कशेळे येथील पशुधन विकास अधिकारी डॉ. शशिकांत थोरात यांनी किसान क्रेडीट कार्डबाबत पशुपालक यांना मार्गदर्शन केले.

पेण येथील पशुधन विकास अधिकारी डॉ. स्मिता जिंतूरकर यांनी महिला पशुपालकांना कुक्कुटपालन, शास्त्रोक्त कुक्कुटपालन, कुक्कुट पक्ष्यांची घ्यावयाची काळजी, अंडी उत्पादन, मास उत्पादन याबाबत मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण कार्यक्रमास युनायटेड वे या संस्थेकडून आर्थिक पाठबळ देण्यात आले होते. युनायटेड वेच्या क्रिस्टीयाना स्टीफन व त्याचे सहकाऱ्यांनी या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सक्रीय सहभाग घेतला. सहभागी झालेल्यांना पशुसंवर्धन विभागाकडून प्रमाणपत्र देण्यात आले.

## नवी दिल्लीतून परतलेल्या भारती कातकरी यांचे गावात जोरदार स्वागत

**चौक** : **प्रतिनिधी**

नवी दिल्ली येथील जी-२० परिषदेत निवड झालेल्या आणि उत्कृष्ट सादरीकरण केलेल्या भारती कातकरी यांचे नढाळवाडी गावात आगमन झाल्यावर त्यांचे ग्रामस्थांनी जल्लोषात स्वागत केले.



तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, पंचायत समिती खालापूर अंतर्गत ग्रामपंचायत लोधिवलीमधील नढाळ आदिवासीवाडी येथील भारती कातकरी या राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत असलेल्या महिला बचत गटाच्या सदस्य असून त्या समुदाय संसाधन व्यक्ती म्हणून तालुक्यात कार्यरत आहेत. नवी दिल्ली येथे जी-२० परिषद साठी त्यांची नेमणूक झाली होती. जी-२० परिषदेत त्यांनी केलेल्या कामाचे सादरीकरण केले. त्यांच्या उत्कृष्ठ सादरीकरणामुळे सन्मान प्राप्त झाला आहे.

भारती ताई यांनी आमच्या ग्रामपंचायतीचे नाव जगभरात प्रसिद्ध केले आहे, अशी भावना सरपंच पूजा तवले, माजी उपसभापती श्याम साळवी व ग्रामविकास अधिकारी भाऊसाहेब गोल्हर यांनी व्यक्त केली. उपसरपंच समीर दळवी, सदस्य भारती दळवी, रेखा भुईकोट, सौ. मोरे, चेतन मेश्राम, सचिन चाळके, नितीन तवले, रवींद्र भुईकोट व ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

# माणगावमध्ये भाजपतर्फे मंगळागौरी स्पर्धा उत्साहात



(छाया : सलीम शेख)

**माणगाव** : **प्रतिनिधी**

भाजप तालुका व शहर महिला संघटन यांच्यातर्फे पारंपरिक मंगळागौरी स्पर्धेचे आयोजन रविवारी (दि. १०) करण्यात आले होते. स्पर्धेत भरारी ग्रुप महाड यांनी प्रथम १०००१ रुपये व सन्मानचिन्ह, स्वामिनी ग्रुप निजामपूर द्वितीय ७००१ रुपये व सन्मानचिन्ह, नारीशक्ती सोमजाई ग्रुप श्रीवर्धन तृतीय क्रमांक ५००१ रुपये व सन्मानचिन्ह तर गौराई ग्रुप रोहा व सहेली ग्रुप पोलादपूर यांनी उत्तेजनार्थ बक्षीस सन्मानचिन्ह पटकाविले.

सर्व सहभागी ग्रुपच्या महिलांना सन्मानचिन्ह देण्यात आले. या स्पर्धेत दक्षिण रायगडातील १५ ग्रुपमधील महिलांनी सहभाग घेतला. भाजपतर्फे तृतीयपंथीयांनाही सहभाग घेण्याची संधी देण्यात आली. स्पर्धेदरम्यान माणगावच्या सुप्रसिद्ध गायिका दीक्षा देसाई व स्नेहल परांजपे यांनी उपस्थितांचे मनोरंजन केले. प्रास्ताविक भाजपच्या मानवाधिकार महाराष्ट्र सेक्रेटरी तथा माणगाव तालुका उपाध्यक्षा यशोधरा गोडबोले यांनी तर सूत्रसंचालन सेवानिवृत्त शिक्षिका सुरेखा दांडेकर यांनी केले.

या वेळी भाजपचे जिल्हा युवा मोर्चा उपाध्यक्ष चिन्मय मोने, तालुकाध्यक्ष उमेश साटम, सरचिटणीस गोविंद कासार, उपाध्यक्ष बाबुराव चव्हाण, युवा नेते निलेश थोरे, संजय जाधव, अरुण पेणकर, मंदार मढवी, महिला मोर्चा सोशल मीडिया महाराष्ट्र प्रदेश सहसंयोजिका मुंबई-खारघर बिना गोगरी, सोशल मीडिया प्रदेश सहसंयोजिका महिला मोर्चा जान्हवी पारेख अंजारा, पंचायतराज व ग्रामविकास कोकण विभाग संयोजिका शर्मिला सत्वे, दक्षिण रायगड महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा हेमा मानकर, जिल्हा महिला मोर्चा पदाधिकारी प्राजक्ता शुक्ला, मंगल मेहता, ज्योती मेथा, स्पर्धेच्या परीक्षक अपर्णा काळे, स्नेहा गांधी, नीता शेठ आदी उपस्थित होते.

स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी भाजप महिला मोर्चा शहराध्यक्ष भारती शेठ, माजी उपनगराध्यक्ष नीलम मेहता, नगरसेविका ममता थोरे, सहचिटणीस दीक्षा देसाई, सरचिटणीस तृप्ती कोठारी, स्नेहल परांजपे, विधीता मेहता, हर्षदा टेकाडे, उपाध्यक्ष रेश्मा सुतार, निशा सुतार, सारिका मेहता आदींसह सर्व कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

## कलगी-तुरा सांस्कृतिक शाहिरी कला मंडळाची सभा उत्साहात

**माणगाव** : **प्रतिनिधी**

माणगाव कुणबी भवन येथे शुक्रवारी कलगीतुरा लोककला क्षेत्रातील विविध मंडळांचे पदाधिकारी, गुरुवर्य, वस्ताद व शाहीर मंडळींची वैचारिक सभा कलगीतुरा सांस्कृतिक शाहिरी कला मंडळ रायगड- रत्नागिरी मंडळाचे अध्यक्ष रामभाऊ टेंबे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.



सभेत लोककलाकारांच्या समस्यांवर चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे भविष्यात उपक्रम, कार्यक्रमांचे आयोजन करून ही कला अधिक वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचा संकल्प करण्यात आला. या सभेला कलगीतुरा कोलाड मंडळाचे अध्यक्ष सुरेश महाबळे , लोककला शाहीर परिषद मंडळ पारवाडी अध्यक्ष संदीप म्हस्के, हरी ओम नृत्य कला पथक मंडळाचे सह संस्थापक व चिठ्ठी मालक पोपट पोटले, कोकण सांप्रदायिक मंडळ अध्यक्ष रमेश जाधव, कलगीतुरा सांस्कृतिक शाहिरी कला मंडळ रायगड रत्नागिरी मंडळाचे उपाध्यक्ष शंकर तुर्डे, कार्याध्यक्ष प्रल्हाद शिरशिवकर, सेक्रेटरी अंकुश जाधव, सहसेक्रेटरी सहदेव उत्तेकर, खजिनदार वामन बैकर, दीपक भोसतेकर, कलगीतुरा रायगड रत्नागिरी उपसमितीचे अध्यक्ष संतोष भात्रे, उपाध्यक्ष सचिन माळी, सहसचिव दत्ताजी सुतार, खजिनदार दीपक भोस्तेकर, संभुराजू तुरेवाले सांस्कृतिक उन्नती मंडळाचे उपाध्यक्ष विद्यानंद अधिकारी, संभुराजू घराणे चिठ्ठी मालक अजित लाड, कलगीतुरा मंडळांचे ज्येष्ठ मान्यवर सदस्य रामचंद्र म्हात्रे, किसन बाटे, नथुराम धामणे, नथुराम पाष्टे, विश्वास रेणोसे, रामदास वारीक, रामचंद्र भोसतेकर, सुनील शिगवण, एकनाथ मांढरे, शीतल विचारे, नारायण पडवळ, महादेव माळी, सभासद, उपस्थित होते.

या सभेदरम्यान कलगीतुरा रायगड-रत्नागिरी समन्वय समितीची स्थापना करून अध्यक्षपदी सुरेश महाबळे यांची एकमुखाने निवड केली.

# भारताचा पाकवर सर्वांत मोठा विजय

## विराट, राहुलनंतर कुलदीप यादवचा जलवा




**कोलंबो : वृत्तसंस्था**

आशिया चषक स्पर्धेच्या सुपर ४मध्ये भारताने पाकिस्तानचा तब्बल २२८ धावांनी पराभव केला आहे. भारताने रविवारी खेळ थांबला तेव्हा २४.१ षटकांत २ बाद १४७ धावा केल्या होत्या. तिथून पुढे खेळताना भारतीय संघाने निर्धारित ५० षटकांत ३५६ धावांचा डोंगर उभा केला. प्रत्युत्तरात पाकिस्तानला ३२ षटकांत आठ गड्यांच्या बदल्यात केवळ १२८ धावा करता आल्या.

भारतीय गोलंदाजांनी टिच्चून गोलंदाजी केली. कुलदीप यादवने पाच बळी घेत पाकिस्तानचा अर्धा संघ तंबूत धाडला. कुलदीपने आठ षटकांत पाच बळी घेतले. त्याला जसप्रीत बुमराह, हार्दिक पांड्या आणि शार्दुल ठाकूर यांनी प्रत्येकी एक बळी घेत चांगली साथ दिली. पाकिस्तानचे नसीम शाह आणि हरिस रौफ दुखापतीमुळे फलंदाजी करू शकले नाहीत. त्यामुळे आठ गडी बाद होताच पाकिस्तानचा डाव संपला.

श्रीलंकेतील सध्याचे वातावरण पाहता आयोजकांनी या सामन्यासाठी राखीव दिवस ठेवला होता. पहिल्या दिवशी पावसामुळे केवळ २४ षटकांचाच खेळ होऊ शकला. त्यानंतर सोमवारी हा सामना २४ षटकांपासून पुढे खेळवण्यात आला. रविवारी कर्णधार रोहित शर्मा आणि सलामीवीर शुबमन गिल या दोघांनी अर्धशतके झळकावली होती. त्यांनी १२१ धावांची सलामी दिली. रोहित ५६ आणि शुबमन ५८ धावा करून बाद झाले. यानंतर दुसऱ्या दिवशी विराट कोहली आणि के. एल. राहुल या दोघांनी भारताच्या डावाला आकार दिला.

विराट आणि राहुल या दोघांनी वैयक्तिक शतके झळकावत तब्बल २३३ धावांची नाबाद भागिदारी केली. या दोघांच्या शतकांच्या जोरावर भारताने ३५० धावांचा टप्पा पार केला. राहुलने १०६ चेंडूंत १२ चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने १११ धावा, तर विराटने ९४ चेंडूंत नऊ चौकार आणि तीन षटकारांनिशी १२२ धावा केल्या.

भारतीय गोलंदाजांसमोर पाकिस्तानचे फलंदाज अपयशी ठरले. संघाचे केवळ चार फलंदाज दुहेरी आकडा गाठू शकले. फखर जमानने सर्वाधिक २७ धावा केल्या. इफ्तिखार अहमद आणि आगा सलमानने प्रत्येकी २३ धावा केल्या. कर्णधार बाबर आझम १० धावा करून बाद झाला. या चौघांशिवाय एकाही फलंदाजाला १० धावांपर्यंत मजल मारता आली नाही. इमाम उल हक नऊ, शादाब खान सहा, फहीम अश्रफ चार, मोहम्मद रिझवान दोन धावा करू शकले. शाहीन आफ्रिदी सात धावा करून नाबाद राहिला.

# जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत रामशेठ ठाकूर विद्यालयाचे यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**



राज्य क्रीडा व युवक सेवा संचलनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी अलिबाग व पनवेल महापालिका यांच्या वतीने मंगळवारी (दि. १२) मुलींच्या शालेय जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन नावडे येथील प. जो. म्हात्रे विद्यालय येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनींनी उज्वल यश संपादन केले.

कुस्ती स्पर्धा १४, १७, १९ वर्षाखालील वयोगटात झाली. रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनी भूमी लक्ष्मण वास्कर (नववी) हिने १७ वर्षाखालील वयोगटात व ४६ किलोखालील वजन गटात व्दितीय क्रमांक, याच वयोगटात व ६५ किलोखालील वजन गटात हिना तौकीर शेख (नववी) हिने व्दितीय; १९ वर्षाखालील वयोगटात व ५७ किलोखालील वजन गटात सानिया शमिम शेख (बारावी कॉमर्स) प्रथम, ६२ किलोखालील वजन गटात मिस्बाह समद बेबल (बारावी कॉमर्स) प्रथम; ६५ किलोखालील वजन गटात कस्तुरी दीपक शिंदे (बारावी सायन्स) प्रथम, ६८ किलोखालील वजन गटात खुशबू हरिकेश सहानी (नववी) प्रथम आणि ५३ किलोखालील वजन गटात प्रिती राजेश्वर गुप्ता (नववी) हिने व्दितीय क्रमांक प्राप्त केला.

या विद्यार्थिनींची मुंबई विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांना क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील, संभाजी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य निशा नायर व माध्यमिक विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक संतोष खांदेकर यांनी अभिनंदन यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# विराट कोहलीने एकाच सामन्यात केले अनेक विक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

आशिया चषक स्पर्धेतील सुपर ४च्या सामन्यात विराट कोहलीने पाकिस्तानविरुद्ध त्याच्या एकदिवसीय क्रिकेट कारकिर्दीतील ४७वे शतक झळकावले. हे त्याचे पाकिस्तानविरुद्धचे वनडेतील तिसरे शतक ठरले. या शतकादरम्यान किंग कोहलीने एकदिवसीय फॉर्मेटमध्ये आपल्या १३ हजार धावा पूर्ण केल्या आणि या फॉरमॅटमध्ये सर्वाधिक धावा करणारा सर्वात वेगवान फलंदाज बनला आणि सचिन तेंडुलकरचा विक्रमही मोडला.

विराट कोहलीने पाकिस्तानविरुद्धच्या या सामन्यात ८४ चेंडूंत शतक पूर्ण केले आणि एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वांत जलद १३ हजार धावा करणारा फलंदाज बनला. यापूर्वी हा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर होता, मात्र आता विराट त्याच्याही पुढे गेला आहे. सचिनने ३२१ डावांत हा टप्पा गाठला होता, तर विराटने २६८व्या डावात हा पराक्रम केला.

विराटने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वांत जलद ७७ शतके झळकावण्यातही यश मिळवले आणि त्यातही सचिनला मागे टाकले. सचिनने ५९४ डावांत ही कामगिरी केली होती, तर विराटने ५६१ डावांत हा पराक्रम केला आहे. विराट एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वांत वेगवान ४७ शतके करणाराही फलंदाज ठरला. योगायोग म्हणजे येथेही त्याने सचिनचा विक्रमही मोडला. सचिनने आपल्या ४३५व्या डावात ४७वे एकदिवसीय शतक पूर्ण केले होते, तर विराटने २६७व्या डावात हा पराक्रम केला.

# रायगड प्रीमियर लीगसाठी ऑक्शन : ४४८ क्रिकेटपटूंवर लागली बोली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या १७९व्या जयंतीनिमित्त रायगड टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने अचानक मित्र मंडळ शिरढोण आयोजित बहुचर्चित रायगड प्रीमियर लीगचा भव्य दिव्य लिलाव सोहळा विसावा रिसॉर्ट्स येथे झाला. यासाठी रायगड जिल्ह्यातील तब्बल २४०१ खेळाडूंनी ऑनलाईन नोंदणी केली होती. त्यापैकी एकूण ४४८ खेळाडू लिलावात खरेदी केले गेले.



रायगड जिल्ह्याच्या १५ तालुक्यांतील ३२ संघ तसेच रायगड, पुणे, मुंबई व ठाणे संघांचे कर्णधार, असोसिएशन अध्यक्ष व व्यवस्थापक यांनी ऑक्शनमध्ये सहभाग घेतला. या सोहळ्याचा प्रारंभ गणेश पूजनाने झाला. त्यानंतर आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या स्मरणार्थ क्रांतिज्योत व क्रीडाज्योत घेऊन वाजत गाजत मिरवणूक निघाली.

या ऑक्शनमध्ये हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३२ किलो अश्वारूढ प्रतिमा असलेल्या प्रथम क्रमांकाच्या चषकाचे अनावरण करण्यात आले. एकूण ३२ संघांचे कर्णधार व शिरढोण पंचक्रोशितील ३२ उगवत्या क्रिकेटपटूंनी वेगवेगळ्या रंगांतील पोशाख परिधान करून पोशाखाचे अनावरण झाले. स्पर्धेतील उत्कृष्ट गोलंदाज व फलंदाज यांना हिरो कंपनीच्या दुचाकीचेसुद्धा अनावरण झाले. आरपीएल विजेत्या सात संघांना तब्बल २० लाखांची रोख व वस्तू स्वरूपात पारितोषिके मिळणार आहेत.

कला, क्रीडा व सामाजिक कार्यात ज्यांनी रायगडचे नाव सातासमुद्रापार नेले अशा ताराबाई केसरीनाथ म्हात्रे, मयुरेश राम घरत, अक्षता अंकुश भगत, सिद्धार्थ संजीवन म्हात्रे, अमृता ज्ञानेश्वर भगत, जनार्दन कोंडू वाकडीकर, अपूर्वा अनंत पाटील यांना रायगड प्रीमियर लीगतर्फे रायगडभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आले.

ऑक्शन सोहळा आरपीलचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष विशाल जितेकर, कार्याध्यक्ष महेश कडू, संदेश पाटील, तेजस म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली रायगड टेनिस क्रिकेट असोसिएशन अध्यक्ष राकेश गायकवाड, उपाध्यक्ष प्रशांत खानावकर, रायगड समालोचक अध्यक्ष संदीप पाटील, पनवेल सामालोचक अध्यक्ष किरण पाटील, उरण समालोचक असोसिएशन अध्यक्ष प्रसाद भोईर, भाजप जिल्हा उपाध्यक्ष व जि. प. चे माजी विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील, बृहन्मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अमोल म्हात्रे, ठाणे क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष मेघनाथ गोंधळे, आर्यन ग्रुपचे मालक समीर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

# जागतिक तायक्वांडो स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंची चमक

## रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये सत्कार






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दक्षिण कोरियात झालेल्या १६व्या जागतिक तायक्वांडो स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी सहा सुवर्ण, दोन रौप्य व दोन कांस्यपदके मिळवून घवघवीत यश संपादित केले आहे. यापैकी सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंचा उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये विशेष सत्कार करण्यात आला.

या स्पर्धेत फाईट प्रकारात मयुरेश घरत, मेघा पाटील, नंदिनी गुजाले, अक्षता भगत, रुद्रा जाधव यांनी सुवर्ण; पुमसे प्रकारात रुद्रा जाधवने सुवर्ण, मेघा पाटील व मयुरेश घरतने रौप्य व अक्षता भगत व नंदिनी गुजाळे यांनी कांस्यपदक पटकाविले. विजेत्या खेळाडूंना ग्रँडमास्टर हुंग्राम क्वान यांच्या हस्ते पदके वितरित करण्यात आली. या सर्व खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक व आंतरराष्ट्रीय पंच सुभाष पाटील व अनिल म्हात्रे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंचा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये सत्कार करण्यात आला.

# पराभवानंतर शाहिद आफ्रिदीने पाकिस्तानी संघाला फटकारले

**कराची : वृत्तसंस्था**

आशिया चषकात सुपर ४च्या तिसऱ्या सामन्यात भारताने पाकिस्तानचा दारूण पराभव केला. या सामन्यातील विजयानंतर एकीकडे भारतीय खेळाडू आनंद साजरा करीत आहेत, तर दुसरीकडे पाकिस्तानचे माजी खेळाडू बाबर आझमच्या संघावर टीका करीत आहेत.

पाकिस्तानी संघाचा माजी खेळाडू शाहिद आफ्रिदीने आपल्या संघावर निशाणा साधला. सोशल मीडियावर एक पोस्ट करीत आफ्रिदीने म्हटले की, विजय आणि पराजय हा खेळाचा भाग आहे, पण लढाई केली नाही, जिंकण्याचा इरादा दाखवत नाही हे फार वाईट आहे. मी माझ्या मागील ट्वीटमध्ये नेमका काय संदर्भ देत होतो. भारत मैदानावर फलंदाजी आणि गोलंदाजीमध्ये नंबर १ म्हणून खेळला. विराट कोहलीचे अभिनंदन. विराट आणि राहुलने शानदार शतके झळकावली.




# ...तर भारत वर्ल्डकपची ट्रॉफी उंचावू शकतो –डिव्हिलियर्स

**जोहान्सबर्ग : वृत्तसंस्था**



दक्षिण आफ्रिकेचा माजी क्रिकेटपटू ए. बी. डिव्हिलियर्सने पुढील महिन्यात होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर बोलताना भारत हा विश्वचषक जिंकणाऱ्या प्रमुख दावेदारांपैकी एक आहे, असे म्हटले आहे.

ए. बी. डिव्हिलियर्सने युट्यूब चॅनेलवर या संदर्भातील विश्लेषणाचा एक व्हिडीओ पोस्ट केला असून त्यात त्याने भारताचा संघ हा शक्तीशाली आहे, मात्र घरगुती मैदानावर विश्वचषक स्पर्धा खेळण्याच्या तणावामुळे भारतीय संघाच्या कमागिरीवर परिणाम होऊ शकतो, अशी शक्यता व्यक्त केली आहे.

मला भारताबद्दल एकच चिंता वाटतेय ती म्हणजे भारत घरच्या मैदानावर खेळत आहे. मागील वेळेस विश्वचषक भारतात खेळवला गेला होता तेव्हा भारताने जेतेपद जिंकले होते. आता याचमुळे त्यांच्यावर फार दबाव असेल. माझ्या दृष्टीने हाच मोठा अडथळा वाटत आहे, असे डिव्हिलियर्स म्हणाला, पण भारतीय संघाने दबावाची चिंता न करता अगदी न घाबरता खेळले पाहिजे. त्यांना हे जमले, तर कदाचित तेच स्पर्धेचे विजेते म्हणून विश्वचषक उचलतील, असा विश्वासही डिव्हिलियर्सने व्यक्त केला आहे.

या वेळी डिव्हिलियर्सने सूर्युकमार यादववरही कौतुकाचा वर्षाव केला. तो म्हणाला, ‘स्काय’ला विश्वचषकाच्या संघात पाहून मला आनंद झाला आहे. तुम्हाला ठावूक आहे की, मी त्याचा मोठा पाठीराखा आहे. तो खरंतर मी ज्या पद्धतीने टी–२० क्रिकेट खेळायचो तसाच खेळतो. त्याला आतापर्यंत एकदिवसीय क्रिकेटमध्ये फारसे यश मिळालेले नाही, मात्र हा फार छोटा खेळ आहे. माइंड स्विच करणे ज्याला जमते तो यशस्वी ठरतो. हे असे माइंड स्विच करण्याची त्याच्याकडे क्षमता आहे. मला अपेक्षा आहे की त्याला एकदिवसीय विश्वचषकाच्या स्पर्धेत अंतिम ११ जणांमध्ये संधी मिळेल. असे झाले तर भारत विश्वचषक जिंकण्याची शक्यता अधिक असेल.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com